23 TO 29 NOV 2020 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 21/11/2020 7:56 PM Page 1

C M Y K

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : ४९ सोमवार दि. २३ नोव्हेंबर २०२० ते रविवार दि. २९ नोव्हेंबर २०२० पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## चारित्र्याचा संशय प्राणावर बेतला मित्रानेच मित्राचा जीव घेतला

डोंबिवली/राजेंद्र वेदांते



संशय खूप वाईट असतो. कारण संशयाचे भूत एकदा का माणसाच्या मानेवर बसले कि माणूस सैरभर होतो त्याचे मानसिक संतुलन बिघडून जाते आणि अशा अस्वस्थ माणसाच्या हातून काहीही घडू शकते. डोंबिवलीमध्ये सर्वत्र दिवाळीचा आनंद आणि उत्साह असताना डोंबिवलीतील ज्योतीनगरमध्ये मात्र भयंकर घटना घडली होती. पत्नीचे मित्राशी अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून एका इसमाने आपल्या मित्राची दगडाने ठेचून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

दिवाळी हा आनंद उधळण्याचा उत्सवाचा सण असल्यामुळे पोलीस हि हा आनंद लुटत आपले कर्तव्य कठोरपणे बजावत होते. कुठेही अनुचित प्रकार घडू नये याची खबरदारी पोलीसांनी घेतली होती. समाजकंटकांवर पोलीस नजर ठेऊन होते. तगडा बंदोबस्त पोलीसांनी लावला होता. पोलीस आपल्या घरचा सण विसरून समाजात शांतता नांदावी म्हणून प्रयत्न करीत होते. समाजात कुणी दुफळी माजवणार नाही यावर पोलीसांची करडी नजर होती. पोलीसांनी एवढी दक्षता घेऊन ही एका गंभीर घटनेने डोंबिवलीत खळबळ माजली होती. परंतु डोंबिवलीतील एका घरात मात्र मृत्यू थैमान घालत होता. या घरात मृत्यूचा नंगानाच चालू होता. पत्नीला भेटायला आलेल्या वक्तीचा संशय आल्याने तिच्या नवऱ्याने केली त्या व्यक्तीची हत्या. ऐन दिवाळीत हा गुन्हा घडल्यानंतर डोंबिवलीत मोठी चर्चा सुरू झाली होती. या खूनाच्या गुन्ह्यानंतर पोलीस यंत्रणा मरगळ झटकून कामाला लागली. या घटनेमुळे डोंबिवली शहरात प्रचंड खळबळ माजली होती. त्या घरात एका व्यक्तीची निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. दिवाळीच्या आनंदावर विरजन पडले होते. ...पान २ वर

# खून करून सांगू लागला साप चावला बापाला पोलिसांनी वाचा फोडली दत्तक मुलाच्या पापाला

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर

पैसा हा घातकी असतो. कारण प्रत्येक माणसाला पैशाची हाव असते. अशावेळी एखाद्या माणसाकडे पैसा नसेल, तर पैशासाठी काहीही करण्याची त्याची तयारी असते. अशावेळी तो रक्ताच्या नात्याचाही विचार करीत नाही. शेगाव तालुक्यातील सागोडा गावात राहणारे निवृत्ती दलभंजन हे निपुत्रिक होते. त्यामुळे त्यांनी आपल्या भावाच्या मुलाला म्हणजेच पुतण्यालाच दत्तक घेतले. पण आपल्या या दत्तक मुलाला पैसे देण्यास ते टाळाटाळ करू लागले. त्यामुळे आज हा पैसे देण्यास तसेच जमीन नावावर करण्यास टाळाटाळ करतोय. तर भविष्यात आपल्याला काय याच्याकडून मिळेल असा विचार दत्तक पुत्राच्या मनात येताच त्याने सरळ निवृत्तीला ठार मारले आणि बापाला साप चावल्याचा कांगावा केला. पण शवविच्छेदन अहवालात त्याचे पितळ उघडे पडताच पोलिसांनी त्याला अटक केली.









आरोपी

विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यात शेगाव हे प्रसिद्ध धार्मिक स्थळ आहे. या शेगाव तालुक्यातील पुर्णा नदीकिनारी सगोडा हे संमिश्र लोकवस्तीचे गाव वसलेले आहे. या गावात गजानन दळभंजन व निवृत्ती दळभंजन हे दोघे भाऊ रहात होते. यातील गजानन यास दोन मुले होती मात्र निवृत्ती यांना एकही मुलबाळ झाले नाही. त्यामुळे निवृत्ती यांनी आपल्या वृद्धापकाळात काळजी घेण्यासाठी भाऊ गजानन याचा मुलगा सोपान यास दत्तक घेण्याचा निर्णय घेतला. सर्व विचाराअंती भावाचा मुलगा सोपान यास दत्तक घेण्याचा निर्णय निवृत्ती दळभंजन यांनी अमलात आणला. सगोडा या गावी सर्वांना परिचीत असलेले निवृत्ती दळभंजन हे सलोख्याचे संबंध ठेवून होते. या गावात ४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी निवृत्ती दळभंजन यांचा शेतात सर्पदंशाने मृत्यू ...पान २ वर

## अनैतिक संबंधाने संसाराचा घात केला दोन कुटुंबाच्या भांडणात पतीचा जीव गेला

फलटण/क्राईम रिपोर्टर



मयत अशिष

विवाहित महिलेने खरे तर तिच्या पूर्वीच्या आयुष्यात जे काही घडले असेल ते लग्नानंतर विसरून जायचे असते. पण ज्या चंचल बायका असतात. त्या लग्न नंतर अधिकच चंचल बनतात आणि नवरा असतानाही दुसऱ्याला जाळ्यात ओढतात. फलटण नजीकच्या मंजूवाडी येथे राहणाऱ्या कामिनी हिने लग्नानंतर गावातल्याच एका अल्पवयीन तरुणाला प्रेमाच्या जाळ्यात ओढले आणि त्याच्याशी मोबाईलवर तासंतास गप्पा मारू लागली. मात्र हि गोष्ट तिच्या पतीला आणि सासरच्या मंडळीना समजताच त्यांनी तिला समजावण्याचा प्रयत्न केला. तरीही ती ऐकत नव्हती. पण या प्रकरणी त्या मुलाच्या घरच्यांना या लफड्याची चाहूल लागताच त्यांनी कामिनीच्या सासरी जाऊन राडा केला. तिला आणि तिच्या सासूला घरातून बाहेर काढून मारले. यावेळी नवरामध्ये येताच त्याच्यावरही कुऱ्हाडीचे घाव घातले. यात त्याचा मृत्यू झाला. तर त्याचा भाऊ गंभीर जखमी झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

फलटण जवळील मुंजवाडी येथे रामोशी मळ्याजवळ माने आणि खोमणे हे कुंटूंब राहतात. अशिष सुनिल माने या बावीस वर्षीय तरूणाचा विवाह गावातील म्हणजे मुंजवाडी येथीलच मधुकर येडे यांची मुलगी कामिनी हिच्याशी गेल्या वर्ष दीड वर्षापूर्वी झाला. कामिनी ही दिसायला देखणी आणि सुंदर होती. तशी ती चंचल होती. ग्रामीण भागात राहत असली तरी ती मॉर्डन विचारांची तशी वागणारी होती. तिचा नवरा अशिष हा ही नव्या विचाराचा होता. आपल्याला ...पान २ वर

## डोंगरीत खून करून दोघे वसईला पळाले सीसीटीव्ही फुटेजमुळे मारेकरी मिळाले

ठाणे/एस. कुमार

आजकाल किरकोळ कारणावरून झालेले वाद सुद्धा इतके विकोपाला जातात कि माणूस त्यात जीव गमावून बसतो. कारण वेगवेगळ्या कारणांनी ट्रस्ट असलेल्या माणसाला पटकन राग येतो आणि रागाला डोळे नसतात. संतापाच्या भरात माणसाच्या हातून काहीही घडू शकते. डोंगरी येथे अशाच किरकोळ वादातून दोन इसमांनी एकाला ठार मारले. मात्र सीसी टीव्ही फुटेज मधून त्यांची ओळख पटतच पोलिसांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या.



दिनांक २५ आक्टोबर रोजी डोंगरी-१ मोबाईल वरील महीला पोलीस उप निरीक्षक पोटवडे व पथक पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असताना ०७:३० वा.चे सुमारास वाडीबंदर ब्रिजवरील, एस.टी. बिल्डींगकडे जाणाऱ्या एसव्हीपी रोड दक्षिण वाहिनी लगत फुटपाथवर एक इसम जखमी अवस्थेत पडलेला आढळून आला. म्हणून त्यांनी गाडीतून उतरून त्या इसमाजवळ जावून पाहिले असता, त्याच्या अंगावर ठीकठिकाणी ताज्या मारहाणीच्या जखमा व अंगावर ठिकठिकाणी काळे-निळे वळ दिसून आले. पोलिसांनी त्या इसमाची पाहणी केली तेव्हा तो इसम निपचित पडलेला होता. त्याचा श्वासोच्छवास बंद होता. त्याचे अंगात केवळ एक मेहंदी रंगाची अंडरवेअर होती. त्या ठिकाणी रहीवाशी जमा झाले होते. म.पो.उपनि. द्वारका पोटवडे यांनी तात्काळ या घटनेची माहिती रात्रपाळी पर्यवेक्षक पो. नि. पोपट साळुखे व रात्रपाळी ठाणे अंमलदार पो.उ.नि. प्रकाश गवळी यांना भ्रमणध्वनी द्वारे दिली. काही वेळातच पो.नि. पोपट साळुखे, पो.उ.नि.प्रकाश गवळी व ...पान ६ वर

## अनैतिक संबंधातून भलतेच घडले बेपता युगुलाचे मृतदेह सापडले



मयत

अंबरनाथ/क्राईम रिपोर्टर

वासना माणसाला सर्व काही विसरायला लावते आणि शरीरसुखाला चटावलेला पुरुष असो किंवा स्त्री नाती गोती मैत्री समाज नैतिकता यापैकी कशाचीही परवा करीत नाहीत. अंबरनाथमध्ये अशाच एका इसमाने मित्राच्या पत्नीशी अनैतिक संबंध ठेवले होते. मात्र या संबंधाना त्या महिलेच्या पतीचा विरोध होता. त्यातून त्यांची भांडणेही व्हायची आणि १७ नोव्हेंबरला दोघेही गायब झाले. या प्रकरणी महिलेच्या पतीने शिवाजी नगर पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रारही नोंदवली होती. मात्र १९ नोव्हेंबरला त्यांचे मृतदेह सापडल्याने एकाच खळबळ माजली असून त्या दोघांनी आत्महत्या केली कि त्यांची कुणी हत्या केली याचा आता पोलीस तपास करीत आहेत.

औद्योगिक क्षेत्रामधील एका खाजगी कंपनीत काम करणाऱ्या प्रियकराने आपल्या मित्राच्या पत्नीसोबत विवाहबाह्य संबंध ठेवले होते. मात्र या संबंधांना तिच्या पतीने विरोध ...पान २ वर

## पती घरी नसताना अचूक साधला नेम दोन आत्ये सासवांचा सुनेनेच केला गेम

गोवा/क्राईम रिपोर्टर

आजकाल सासू सुनेचे कधीच पटत नाही. जिथे सुना सख्ख्या सासूला विचारात नाहीत तिथे आत्ये सासूचे काय घेवून बसलात. सासू सुनेचे न पटण्यामागचे मुख्य कारण म्हणजे जनरेशन गॅप. सासवा जुन्या विचारांच्या असतात त्यांना रीतीरिवाज आणि संस्कृती बाबत आस्था असते, तर नव्या जमान्याच्या तरुण सुनांना फक्त राजा राणीचा संसार आणि मौजमजा हवी असते. अशा वेळी जुन्या वृद्धी परंपरा जपणाऱ्या सासवांचा सुनांना तिटकारा असतो आणि त्यातूनच सासू सुनेची भांडणे सुरु होतात हि भांडणे कधी कधी इतकी विकोपाला जातात कि तरुण सुना आपल्या सासूचा काटा काढायलाही मागेपुढे पाहत नाहीत.



गोव्यातील शिवोली गावात आपल्या दोन अविवाहित आत्यांसोबत राहणाऱ्या जुलियो लिबो हा विवाहित होता आणि त्याला दोन मुलेही होती. पण त्याच्या पत्नीचे जुलियो लोबोच्या आत्यांसोबत पटत नसे. कारण तिने नोकरी करणे त्यांना आवडत न्हवते. त्यातून त्यांची रोज भांडणे होत असत. अखेर या रोजच्या भांडणाला कंटाळून ज्युलीयोची पत्नी रोविना हिने आपल्या दोन्ही आत्ये ...पान २ वर

## ब्लॅकमेलिंग त्याच्या अंगाशी आली मित्रानेच मित्राची हत्या केली

उल्हासनगर/क्राईम रिपोर्टर



मयत

मैत्री मध्ये कधीही वितुष्ट येणार नाही याची सर्वच मित्रांनी काळजी घ्यायची असते. पण आजकाल काही मित्र इतके कृतघ्न असतात कि स्वतःच्या शुल्लक स्वार्थासाठी मैत्रीचा खून करतात. मित्राच्या घरी जाऊन त्याच्या पत्नीवर किंवा बहिणीवर वायीत नजर ठेवणे किंवा मित्राचे एखादे गुपित सार्वजनिक करण्याची धमकी देऊन त्याला ब्लॅकमेल करणे असे प्रकार सुरु आहेत आणि अशाच प्रकारातून मैत्रीत वितुष्ट येते आणि त्यातून एखाद्याचा जीव जातो. उल्हासनगर येथील अशाच एका घटनेत एका मित्राने आपल्या मित्राचा व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन त्याला ब्लॅकमेल करायला सुरवात करताच त्याच्या मित्राने आपल्या त्या ब्लॅकमेलर मित्राची हत्या केली. मात्र पोलिसांनी मोठ्या शिथाफिने आरोपीला अटक केली आहे.

उल्हासनगर कॅम्प ५ येथील एका मित्राने पैशाची मागणी करुन व्हिडियो व्हायरल करण्याची धमकी देणाऱ्या मित्राची ...पान ६ वर

## जमिनीचा वाद विकोपाला गेला काकानेच पुतण्याचा खून केला



मयत विशाल

निपाणी/क्राईम रिपोर्टर

काका पुतण्या यांच्यातील वाद पेशवे कला पासून महाराष्ट्राला ठाऊक आहेत. शनिवार वाड्यात नारायण रावाचा खून हा काका पुतण्याच्या वादातून झालेला होता. फरक एवढाच कि सुपारी घेतलेल्या मारेकऱ्यांना धरावे ऐवजी मारावे असे आदेश काकी आनंदी बाईनी दिले होते. त्यानंतरही काका पुतण्याच्या वादातून कधी काकाला तर कधी पुतण्याला जीव गमवावा लागला होता. कर्नाटकातील बेनाडी गावात काका पुतण्यांमध्ये जमिनीवरून वाद होता आणि याच वादातून पुतण्याने काकाला चोपले होते. त्याचाच बदल घेण्यासाठी काकाने पुतण्याच्या हत्येची सुपारी दिली आणि त्याची हत्या घडवून आणली आणि स्वतः खुनी असूनही आपल्यावर कुणाचा संशय येऊ नये म्हणून पुतण्याच्या मारेकऱ्याला लवकर पकडा असे पोलीस ठाण्यात जावून सांगत होता. मात्र या लबाड काकाचे बिंग फुटले आणि पोलिसांनी त्याच्यासह सुपारीबाज मारेकाऱ्यांनाही ताब्यात घेतले.



निपाणी जवळील आडी बेनाडी हे गाव सधन शेतकऱ्याचे गाव म्हणून परिचित आहे. आडी येथील दत्त देवस्थान हे जागृत देवस्थान मानले जाते. बेनाडी येथे सतिश पाटील आणि महेश पाटील यांची वाडवडिलार्जीत शेती आहे. या दोन पाटलाच्यात याच शेतीच्या हिस्सायावरून बऱ्याचवेळेला भांडणे आणि वाद विवाद होत होते.सतिशचे वडिल दादासाहेब आणि महेश पाटील याचे वडिल हे सख्ये भाऊ भाऊ होते. नात्याने महेश पाटील आणि सतिश पाटील हे दोघे सख्ये चूलत ...पान ६ वर

## नपुंसक पतीमधला विकृत नराधम जागला पैशासाठी पत्नीला ब्लॅकमेल करू लागला

जळगाव/क्राईम रिपोर्टर

लैंगिक दुर्बलता हि माणसाला विकृतीकडे नेत असते. अशावेळी जर माणसाला लैंगिक शक्ती वाढवणारी औषधे घेऊनही मनासारखी इच्छापूर्ती मिळत नसेल तर मग त्याच्या विकृतीला क्रौर्याची धार चढते आणि मग तो अक्षरशः पशु बनतो. विवाह वधूवर सूचक मंडळाच्या माध्यमातून लग्न जुळलेल्या तरुणीचा पती लैंगिक दृष्ट्या कमजोर असल्याने तो उत्तेजक गोळ्या खायचा. पण त्याचाही असर होत नसल्याने पती पत्नीमध्ये वाद होऊ लागले. अखेर या वादामुळे चिडलेल्या पतीने पत्नीला ब्लॅकमेल करण्यासाठी तिची विवस्त्र छायाचित्रे घेऊन तिला ब्लॅकमेल करू लागला. तिला माहेरून पैसे आण अन्यथा तुझे फोटो व्हायरल करू अशी धमकी देऊ लागला. तिचे बँक खाते त्याने हॅक केले. कोऱ्या स्टँम्पपेपरवर तिच्या जबरदस्तीने सह्या घेतल्या. विशेष म्हणजे यात सासू सासरेही सहभागी होते. अखेर तिने पती आणि सासू सासऱ्यांच्या विरोधात पोलिसांकडे धाव घेतली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरु केला आहे.







चारचौघात ठळकपणे खुलून दिसणारी कामिनी लग्नाच्या वयात कधीच आली होती. ती पंचवीस वर्षाची झाली होती. कामिनी दिसायला देखणी व त्यातल्या त्यात बँकेत जॉब करणारी अर्थात कमावती होती. बँकेत जॉब करणारी देखणी व कमनीय बांध्याची कामिनी अर्थातच बुद्धिजीवी होती हे सांगले न लगे. ब्युटी अलाँग वुईथ नॉलेज असे तिचे वर्णन करता येईल. रुपवान कामिनीला सरस्वती प्रसन्न झाली होती. विद्या तिच्या अंगी बहरलेली होती. याशिवाय परमेश्वरने तिला देखण्या रुपाचा अनमोल ठेवा देखील दिला होता. विना मेकअप, विना ब्युटी पॉर्लर तिच्या रुपाचा झरा खळखळून झरझर वहात होता. लग्नायोग्य कामीनीच्या लग्नाचा ...पान ६ वर

C M Y K

## पान १ वरून....

### खून करून सांगू लागला साप चावला ...

झाल्याची खबर गावभर पसरली. त्यामुळे त्यांच्या शेतात गावकऱ्यांनी एकच गर्दी केली. गावातील प्रत्येकाशी अत्यंत सलोख्याचे संबध असलेल्या निवृत्ती दळभंजन यांचा मृतदेह पाहून अनेकांची मने गहिवरली. त्यांचा दत्तक पुत्र सोपान जोरजोरात आक्रोश करु लागला. गावकऱ्यांनी निवृत्ती दळभंजन यांना त्वरित शेगाव येथील सईबाई मोटे उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मयत निवृत्ती यांच्या मृतदेहाची सखोल तपासणी केली. तपासणी अंती वैद्यकीय अधिका-यांनी हा सर्पदंश नसून गळा आवळून खून असल्याचा अहवाल दिला. मयत निवृत्ती दळभंजन यांच्या गळ्यावर आवळल्याचे व्रण दिसत होते. सर्पदंश झाला नसल्याचे समजताच गावकरी गोंधळात पडले. मृतदेह पुढील तपासकामी फॉरेन्सिक लॅब अकोला येथे रवाना करण्यात आला. फॉरेन्सिक तज्ज्ञांनी निवृत्ती यांचा खून झाला असल्याचा अहवाल दिला. या अहवालामुळे गावात पुन्हा खळबळ माजली. शेगांव ग्रामीण पोलिसांनी या खूनाचा छडा लावण्याकामी हालचाली गतीमान केल्या. मयत निवृत्ती यांचे गावात कुणासोबत काही वाद होते का?, त्यांचा खून कुणाला फायदेशीर ठरु शकतो. घटनेच्या दिवशी त्यांचा दिनक्रम काय होता. त्यांना सर्वात पहिले मृतावस्थेत कुणी पाहीले? या सर्व घटकांची चाचपणी करण्यात आली. शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलिस निरिक्षक संतोष टाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अरविंद कुमरे, पोलिस नाईक सुरेश हरणे यांनी गोपनीय माहिती संकलीत करण्यास सुरुवात केली. मयत निवृत्ती दळभंजन यांचेवर सगोडा या गावी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अत्यंत मृदू भाषी असलेल्या निवृत्ती दळभंजन यांचा खून कुणी व का केला असावा याची गावात चर्चा सुरु झाली होती. पोलिसांनी प्रत्येक दिशेने तपास सुरु केला. मात्र संशयास्पद काहीच वाटत नव्हते. तपास फिरुन फिरुन मयताचा दत्तक मुलगा सोपान याच्यावर येवून स्थिरावत होता. त्यामुळे सोपान बाबत पोलिसांनी अधिक माहिती घेण्यास सुरुवात केली. मयत निवृत्ती दळभंजन यांनी सोपान यास दतक घेतले होते. त्याचा विवाह सुद्धा करुन दिला होता. मात्र वेळोवेळी खर्चास लागणारे पैसे मयत निवृत्ती दळभंजन हे सोपान यास देत नसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सुरुवातीला त्याला चौकशीकामी बोलावण्यात आले. त्याने आपल्याला काहीच माहिती नसल्याचा आव आणला. मात्र त्याला विश्वासात घेवून त्याला भावनीक रितीने तयार करण्यात आले. मग मात्र त्याच्या डोळ्यात अश्रू दाटून आले. आपणच आपल्या पित्याची हत्या केली असल्याची कबुली त्याने पो.नि. संतोष टाले यांच्याजवळ दिली. त्याने सर्व घटनाक्रम कथन केला. गजानन आणि निवृत्ती हे दोघे भाऊ होते. गजानन यांना दोन मुले होती. निवृत्ती यांना अपत्य नसल्यामुळे त्यांनी म्हातारपणाची काठी म्हणून मोठा भाऊ गजानन यांचा मुलगा सोपान यास दोन वर्षापुर्वी दतक घेतले होते. त्यांचेकडे ५ एकर शेती होती. तसेच वडिलोपार्जित काही शेती होती. सोपान यास दत्तक घेतल्यानंतर त्याचा विवाह त्यांनी मोठ्या धूमधडाक्यात लावून दिला होता. मात्र सोपान यास कधी कधी खर्चाला पैसे रहात नव्हते. त्यामुळे तो अडचणीत येत होता. निवृत्ती दळभंजन त्याला पैसे देण्यास टाळाटाळ करत होते. दोन वर्ष लोटले तरी बाप पैसे देत नसल्याने दत्तक पुत्र सोपान अस्वस्थ झाला होता. त्यातच सोपनची पत्नी गरोदर असल्याने तिच्या उपचारासाठी नेहमी पैसे लागत होते. तिला दवाखान्यात न्यावे लागत असल्यामुळे त्याला पैसे लागत होते. मात्र त्याचे वडील त्याला पैसे देत नव्हते. त्यामुळे सोपान वैतागला होता. त्यामुळे तो शेती नावावर करुन देण्याचा मयत निवृत्ती यांच्याकडे तगादा लावत होता. मात्र निवृत्ती दळभंजन यांनी त्याला मी जिवंत असे पर्यत शेती मिळणार नाही असे त्याला ठणकावून सांगितले होते. वडिलोपार्जित असलेली काही शेती निवृत्ती यांनी पत्नीच्या नावावर करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे सोपान चिडला होता. वडील जिवंत असेपर्यत आपल्याला दमडीची संपत्ती मिळणार नाही असे मनाशी म्हणत त्याने आता निवृत्ती यांना संपवण्याचा निर्णय घेतला होता. मनातच त्याने एक योजना आखली. बाप ५ वाजता शेतात नियमितपणे गवत आणण्यासाठी जात असे. त्यावेळी शेतात कुणी नसते हे त्याला ठावुक होते. त्याचवेळी निवृत्ती यांचा खून करुन टाकू असे त्याने मनाशी ठरवले. ४ ऑक्टोबर रोजी सोपान दुपारी ४ वाजता शेतात गेला आणि बाप निवृत्ती यांची येण्याची वाट पाहू लागला. नियमितपणे गुरांसाठी गवत आणणारा निवृत्ती दळभंजन सायंकाळी ५ वाजता शेतात आला आणि गवत कापू लागला. बाप गवत कापण्यात दंग असल्याची संधी साधून दत्तक पुत्र सोपान याने निवृत्ती यांच्या गळ्यात मागून दोरी टाकली आणी लागलीच पुर्ण ताकदीने काही कळायच्या आत त्यांना गळफास दिला. काही क्षणात तडफडत निवृत्ती दळभंजन यांनी जागीच जीव सोडला. त्यानंतर काही वेळ विचार करत सोपान याने अनुकुचीदार ताराने मयताच्या डाव्या पायावर सर्पदंश झाला असे भासावे म्हणून दोन खुणा केल्या आणि गावात पळत जावून निवृत्ती यांना साप चावल्याचे सांगू लागला. गावकऱ्यांनी मृतदेह आणि पायावरील दोन खुणा पाहून त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवला. मात्र रुणालयात डॉक्टरांनी सर्पदंश झाला नसल्याचे सांगितले. तसेच पोलिसांनी गळ्यावर व्रण पाहिल्यामुळे संशयाला पुष्टी मिळाली. अवघ्या २४ तासात शेगांव ग्रामीण पोलिसांनी घटना उजेडात आणून आरोपी जेरबंद केला. अल्पावधीत कोणताही पुरावा नसताना शेगाव ग्रामीण पोलिसांनी घटना उघडकीस आणल्याने सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षक अरविंद चावरीय, अप्पर पोलीस अधीक्षक हेमराजसिंह राजपूत, पोलीस निरीक्षक संतोष टाले यांच्या मार्गदर्शना खाली पोलिस उप निरिक्षक अरविंद कुमरे, पो.हे.कॉ. सुरेश हरणे, सुरेंद्रसिंह चव्हाण, सहायक फौजदार अगडते, पो.कॉ. मुकेश पवार यांनी पुर्ण केला.

### चारित्र्याचा संशय प्राणावर बेतला...

ज्या घरात खून झाला होता तिथे स्मशान शांतता पसरली होती. डोंबिवली शहरात ३१ वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दार ठोठवल्याच्या रागातून ही हत्या करण्यात आली असल्याची माहिती आहे. दिवाळीच्या दिवशीच घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दीपक मोरे या आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. डोंबिवली पूर्वे येथील ज्योतीनगर परिसरात राहणाऱ्या दीपक मोरे आणि संजय गवळी या दोघांमध्ये शनिवारी (१४ नोव्हेंबर) रात्री साडेबारा वाजेच्या सुमारास वाद झाला. हा वाद विकोपाला गेला आणि दीपक मोरे याने संजय याच्यावर दगडाने हल्ला चढवला. दिपकने संजयच्या वर्मी घाव घातल्याने या घटनेत संजय याचा मृत्यू झाला. यानंतर आरोपी दिपक मोरेने घटनास्थळावरून पलायन केले होते परंतु पोलीसांनी तात्काळ धावाधाव करून डोंबिवली रामनगर पोलिसांनी आरोपी दीपक मोरे याला अटक केली. अटक आरोपी दिपक मोरे आणि मयत संजय गवळी हे एकेकाळीचे जिवलग मित्र होते. त्यामुळे संजय दिवकच्या घरी येत जात होता. दिपकची पत्नी ही संजय बरोबर मनमोकळेपणे गप्पा मारत होती. या दोघांमध्ये तसा कोणताही संबध नव्हता. परंतु या दोघांच्या या बोलण्याचा दिपकने वेगळा अर्थ लावला होता. यावरून आपल्या पत्नीसोबत संजय गवळी याचे अनैतिक संबंध असल्याच्या संशय आरोपी दीपक मोरे याला होता. यावरुन दोघांमध्ये वाद झाले होते. शनिवारी रात्री संजय याने दीपकचे दार ठोठावले.दिपक घरी नसेल असे संजयचा समज झाला होता. म्हणून त्याने दिपकच्या घरी प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. यानंतर आधीच मनात राग असलेल्या दीपकच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली आणि त्याने रागाच्या भरात त्याची दगडाने ठेचून संजय गवळी याची हत्या केली. दिपक मोरे संशयाच्या जाळ्यात गुरफटुन गेला होता. आपल्या पत्नीचे आणि संजय गवळी यांचे अनैतिक संबंध असल्याचा संशय त्याला स्वस्थ बसू देत नव्हता. पत्नी आणि संजय यांच्या विरुद्ध त्याच्या डोक्यात संतापाची आग धूसमत होती. त्याच्या संतापाचा उद्रेक झालेला असतानाच अचानक संजय गवळीने त्याच्या घराचे दार ठोठवले आणि नको तेच अघटीत घडले. दिपकने खात्री न करताच संजयचा खून केला. त्याने हे कृत्य रागाच्या भरात केले असले तरी एका निष्पाप तरूणाची त्याने हत्या केली आहे. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. मयत संजय याच्या विरोधात अनेक गुन्हे दाखल आहेत अशी माहिती रामनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन सांडभोर यांनी दिली आहे.

### अनैतिक संबंधाने संसाराचा घात केला...

देखणी बायको मिळाली म्हणून तो खुश होता. कामिनी ही नव विवाहित असली तरी ती तास् न तास आपल्या मोबाईलवरून कुणाशी तरी बोलत होती.याबाबत शंका घ्यायला तशी जागा ही होती. दिवस आणि रात्र ती आपल्या कानाला लावलेला मोबाईल काढत नव्हती. लग्नाअगोदर तिचे गावातीलच कोणत्या तरी तरूणाशी प्रेमप्रकरण असल्याची चर्चा होत होती. ही माहिती अशिषलाही लागलेली होती. यातूनच त्या दोघांचे भांडण ही होत होते. मागचे सगळं विसरून तू राहा असे नवरा तिला सांगत होता. पण ती तशी कोणाचेच काही ऐकत नव्हती. काही झाले तरी ती आपल्या मोबाईलवरून कुणाशी तरी बोलत होती. तिचा स्वभावच तसा होता. यातच अशिषला तिचे गावातीलच रोहित खोमणे नावाच्या १७ वर्षीय अल्पवयीन मुलाबरोबर प्रेमप्रकरण असल्याची माहिती मिळाली होती. याचा अर्थ आपली पत्नी कामिनी ही त्याच्याशी मोबाईलवरून तास् न तास बोलत असते असा त्याने काढला होता. तिने आता आपल्याशी लग्न केले असल्याने आपल्याशी प्रामाणीक राहावे अशी त्याची इच्छा होती. तशी समज ही त्याने कामिनीला दिली होती. त्यावेळेपासून तिने मोबाईलवरून बोलणे थांबवले होते. तिच्या स्वभावात थोडासा बदल झालेला होता. म्हणून तिच्या नवऱ्याने व सासूने आणि तिच्या घरच्या लोकांनी ही तिच्यावर विश्वास ठेवला होता. त्यामुळे ते लोक हल्ली तिला काही बोलत नसत. तिने ही आपले बाहेर कुणाशी कसले ही लफडे नाही, किंवा कुणाबरोबर तसे प्रेमसंबंध नाहीत याची ग्वाही आपल्या कुंटूंबाला दिला होता. त्यामुळे हा विषय तिच्या नवऱ्याच्या डोक्यातून गेलेला होता. तरीही याचा जाब अशिष याने रोहित खोमणे याला विचारलेला होता. त्यातून त्या दोघांची बऱ्याच वेळेला बाचाबाची आणि वाद ही झालेला होता. अशिष याने रोहित याला आपली पत्नी कामिनी हिचा नाद सोड. तिला वारंवार फोन करून नकोस असे बजावून याचे परिणाम वाईट होतील असे धमकावले होते.यावर रोहित ही माझा काहींच संबंध नाही, तू तुझ्या बायकोला याबाबत विचार जा.असे सांगितले होते. तिच मला सारखे फोन करते असे सांगून त्याने आपले हात झटकले होते. सोमवार दि.१६ नोव्हेंबर रोजी दिवाळीची भाऊबीज असल्याने अशिषने पत्नी कामिनी हिला गावातीलच तिच्या माहेरच्या घराकडे सकाळी नेऊन सोडले होते. व तेथून तो परत आपल्या घराकडे आला होता. त्यानंतर दुपारी चारच्या सुमारास कामिनी ही माहेरहून आपल्या सासरच्या घराकडे आली होती. त्यावेळी तिने घरात आपली सासू सुनिता यांना सांगितले की, ती आज माहेरच्या घराकडे असताना दुपारच्या वेळेस अर्चना खोमणे आणि त्याचा मुलगा रोहित आणि त्याची बहिण जया बाळू जाधव हे तिघेजण माहेरच्या घरी येऊन मला व माझी आई सविता हिला शिवीगाळ करून दमदाटी करून गेलेत तिने असे सासु सुनिताला सांगितल्यानंतर ती ही खोमणे यांना जाब विचारूयाच असे म्हणत होती. परंतु त्यावेळी घराकत कुणी पुरूष मंडळी नसल्याने ती गप्प बसली होती. सुनिता माने यांना ही कुठे तरी आपली सून ही चुकत असल्याचे वाटत होते. त्याशिवाय खोमणे कुंटुबियांनी कामिनीच्या चारित्र्याचा संशय घेऊन तिच स्व:ता रोहित याला फोन करून बोलावून घेते असा आरोप केला नसता असे वाटत होते.म्हणून त्यांनी सून कामिनी हिला सारखे याबाबत विचारणा करीत तु खरे ते काय सांग असे म्हरत होत्या. परंतु कामिनी ही माझे कुणाशी काहीही कसले ही संबंध नाहीत असे सांगत होती. त्यावेळी सासू व सूनेत त्याचेत वादावादी ही झाली होती. रोहित याची आई अर्चना हिने कामिनी हिला अर्वाच्च भाषेत बोलून तूच माझ्या पोरग्याला नादाला लावतेस आणि आता सती सावित्रीचा आव आणतेस म्हणून चांगली खरडपट्टी काढली होती. हे सुनिता माने यांच्या कानावर आलेले होते. एकंदर या प्रकरणात नक्कीच काही तरी काळेबेरे असणार हे माने कुटुंबियांना वाटत होते. पण आता काय करायचे असा प्रश्न त्याचे समोर पडला होता. आपली सुन चुकत आहे असे सुनिता माने यांना वाटत होते. तर आपली पत्नी कामिनी हिचे ही कुठे तरी चुकतआहे असे अशिषला वाटत होते. हे प्रकरण चांगलेच वाढलेले होते.त्या दिवशी सायंकाळी पाचच्या सुमारास मुंजवाडी येथील रामोशी आळीत परत रोहित खोमणे,नकुसा अरूण आडके, दत्तु बबन सितकल, सुनिल आडके, अर्चना खोमणे जया जाधव हे सर्वजण अशिष याच्या घरासमोर येऊन त्याला व त्याच्या घरच्या लोकांना शिवीगाळ करु लागले होते. त्यावेळी त्यांनी कामिनी हिला घरातून बाहेर ओढून काढून तिला लाथाबुक्कांनी मारहाण करायला सुरूवात केली होती. त्यावेळी घरात अशिष ही होता. तो पत्नीला सोडावयला गेला असता त्याला दत्तु सितकल,रोहित आणि सुनिल आडके यांनी मारहाण करायला सुरूवात केली होती. यातच अर्चना खोमणे यांनी अशिषची आई सुनिता माने हिला देखिल मारहाण करायला सुरूवात केली. या भांडणात अर्चना ही सुनिता यांना म्हणत होती की, 'तुझी सूनच कामिनी ही माझ्या पोराला नादाला लावते, त्याला सारखे फोन करून बोलावून घेते आणि तुम्ही आम्हाला दादागिरी करता होय' असे म्हणत तिलाही मारहाण करायला सुरूवात केली होती. त्यावेळी रामोशी आळीत मोठी धुम:चक्री उडालेली होती.खोमणे कुटुंबिय यांनी आपल्या हातात कुऱ्हाड आणि काठया घेऊन आले होते. खोमणेच्या कडील महिला या सुनिता माने आणि कामिनी यांना लाथाबुक्कांनी मारहाण करीत होत्या. तर दुसऱ्या बाजुला पुरूष मंडळी हे अशिष व त्याचा भाऊ संकेत याला मारहाण करीत होते. सुनिल आडके याने तर आपल्या हातातील कुऱ्हाडीने अशिष व संकेतवर वार केले होते. माने कुटुंबियांना जबर मारहाण होत होती. अशिष तर त्या मारहाणीत पुरता घायाळ झाला होता. याचवेळी रोहित आणि दत्ता सितकळ यांनी अशिष याला मारहाण करीत त्याचे डोके जवळच्याच सिमेंटच्या कट्टयावर नेऊन जोरात आदळले होते. त्यातच तो बेशुध्द पडला होता. तर संकेत माने याच्यावर ही कुऱ्हाडीने वार झाल्याने तो ही बेशुध्द पडला होता. रामोशी आळीत माने यांच्या घरासमोर मोठा आरडाओरडा आणि गोंधळ सुरू झाल्याने बाजुच्या गल्लीतील लोक ही घटनास्थळी धावत पळत आले होते. घटनास्थळी लोक येत असताना बघून खोमणे याच्या गटातील लोकांनी माने यांच्या घरासमोरून काढता पाय घेत माने यांना धमकी देत व शिवीगाळ करीत पळून गेले होते. दरम्यान या घटनेतील गंभीर जखमी झालेल्या अशिष माने व संकेत माने याला लोकांनी उपचारासाठी फलटण येथील खाजगी दाखान्यात उपचारासाठी दाखल केले होते. तेथे उपचार सुरू असतानाच अशिष याचा मृत्यु झाला होता. तर संकेत माने यांची परिस्थिती गंभीर बनली होती. दरम्यान या घटनेची माहिति फलटण ग्रमीण पोलीस स्टेशनला मिळाल्याने पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते.त्यांनी घटनेचा पंचनामा करून दवाखान्यातून ही या घटनेची माहिती घेतली होती. या घटनेत अशिष माने याचा मृत्यु झाल्यानेही खूनाची घटना ठरली होती. या घटनेची फिर्याद फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनला सुनिता सुनिल माने यांनी दिली होती. त्यांच्या फिर्यादीवरून पोलीसांनी या घटनेतील रोहित सह त्याची आई अर्चना खोमणे, दत्तु सितकल, सुनिल आडके, जया जाधव, अशाबाई उर्फ नुकसा आडके यांच्या विरोधात अशिष सुनिल माने (वय २२) याच्या खूनप्रकरणी व मारहाणी प्रकरणी भादंवी कलम ३०२,सह विविध कलमाखाली गुन्हा नोंद करून त्यांना ताब्यात घेतले होते. पोलीसांनी या सर्वाना फलटण येथील मा.कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने अल्पवयीन रोहित खोमणे याची रवानगी बालसुधारगृहात तर इतरांची पोलीस कोठडीत रवानगी केली होती. पोलीस कोठडी दरम्यान या सर्वानी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली. पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेल्या काठया आणि कुऱ्हाड जप्त केले होते. सदर घटनेचा पुढील तपास पोलीस अधिक्षक ऑचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन सावंत हे करीत आहेत. हल्लीच्या महिला या आपल्या मोबाईलवरून तास्न तास कुणाशी तरी बोलत असतात, यातूनच त्याचेवर शंका घ्यायला जागा राहत असते. हिच गत कामिनी हिची झाली होती. तिला समज देवून ही ती आपल्या मोबाईलवरून रोहितशी बोलत होती.त्यातूनच रोहितच्या कुंटुबियांनी तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला व तिच्या नवऱ्याला आणि कुटूंबाला मारहाण केली होती. ही घटना कुठल्या कुठे गेली होती. यातूनच विनाकारण तिचा नवऱ्याचा म्हणजे अशिष माने याचा बळी गेला होता. विवाहित महिलांना मोबाईलवरून तास्न तास बोलणे किती महागात पडू शकते हेच या घटनेवरून दिसून येते.

### अनैतिक संबंधातून भलतेच घडले...

केल्यानंतर देखील त्यांनी आपले भेटीगाठी सुरू ठेवल्या होत्या. मात्र अचानक दोघांचे मृतदेह अंबरनाथच्या प्रसादम रेसिडेन्सी मध्ये सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रातील एका खाजगी कंपनीमध्ये अजित शहा आणि संदीप सक्सेना हे दोघे मित्र काम करत होते. मात्र संदीप सक्सेना आणि अजित शहा याची पत्नी जयंती यांचे शारीरिक संबंध सुरू झाले होते. मात्र या संबंधांना जयंतीचे पती अजित शहा यांनी विरोध केला होता. मात्र कालांतराने त्यांचे प्रेमसंबंध अधिक घट झाल्याने ते अजित त्याच्या नकळत देखील भेटू लागले. तर ही महिला १७ तारखेपासून बेपत्ता असल्याची तक्रार तिच्या पतीने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात केली होती त्यानंतर गुरुवारी जयंती आणि तिचा प्रियकर संदीप सक्सेना यांचे मृतदेह अंबरनाथमध्ये सापडले आहेत अंबरनाथच्या शिवाजीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत मृतदेह ताब्यात घेतले आहेत. सध्या पोलीस घटनेचा पुढील तपास करीत आहेत.

### पती घरी नसताना अचूक साधला नेम...

सासुंचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी एका ओळखीच्या माणसाला ३० हजारांची सुपारी दिली आणि एके रात्री पती घरात नसताना आपल्या दोन्ही आत्ये सासवांचा खून केला व पळून गेली. मात्र पोलिसांनी तिला गोवा सोडून पळून जाण्यापूर्वीच साथीदारासह अटक केली. म्हापसा जवळील शिवोली येथे रोविना ही आपला पती ज्युलिओ लिबो आणि दोन मुले व दोन वयोवृध्द आत्या याचेसह राहत होते. त्याच्या लग्नाला दहा वर्ष झाली होते.ख्रिचन समाजातील हे कुटुंब तसे समाधानी होते. रोविना आणि ज्युलिओ यांना सात वर्षीचा आणि चार वर्षीचा अशी दोन मुले होती. रोविना आणि ज्युलिओ हे दोघे जण खरे तर ज्युलिओ याच्या आत्यांच्या घरात राहत होते. मार्ता क्लोमिटोंना लोबो व वेरा लोबा या दोघीही अविवाहित होत्या.त्या दोघी ही आता वृध्दत्वाकडे झुकलेल्या होत्या. त्यांनी लग्न केले नसल्याने त्याना मुल बाळ नव्हते. म्हणून त्यांनी बऱ्याच वर्षीपूर्वी आपल्या भावाचा मुलगा ज्युलिओ आणि त्याच्या पत्नीला म्हणजे रोविनाला आपल्याकडे राहण्यास बोलावून घेतले होते. ते दोघे ही त्या दोंघीची काळजी घेत होते. ते दोघे आणि त्याची दोन्ही मुले त्यांच्याकडे राहयला आल्याने त्याचे एकत्र कुटूंब बनले होते. ज्युलिओ हा त्या दोघीचा केअर टेकर बनला होता. त्याला कोणताही कामधंदा करण्याची गरज उरली नव्हती. कारण त्याच्या दोघी आत्याची प्रॉपटी ही मोठी होती. त्यातून उत्पन्न ही जास्त मिळत होते. रोविना मात्र घरात बसून कंटाळा येत असल्याने म्हापसा येथे एका कंपनीत नोकरीला जात होती. त्यातून तिचा दिवस जात होता.घरी आल्यावर मात्र तिला या ना त्या कारणातून दोघी आत्या सासूकडून बोलणे खावे लागत होते. त्या दोघी आत्या सासूंचा तिने नोकरी करू नये असे वाटत होते. त्यातून रोविनाचे त्या दोघीशी पटत नव्हते. कोणत्या ना कोणत्या कारणातून तिचे आत्या सासुशी पटत नव्हते. दररोज घरात भांडणे ही होत होती. वाद विवाद होत असल्याने ज्युलिओ हा देखिल कंटाळलेला होता. तो दारूच्या व्यसनाच्या जास्तच आहरी गेलेला होता. तो सकाळ पासून रात्री झोपेपर्यंत दारू पित होता. तो ही दारू पिवून आला की रोविनाला भांडणात मारहाण करीत होता.तो त्या भांडणात आपल्या दोन्ही आत्यांची बाजू घेत होता. हे रोविनाला पटत नव्हते. ज्युलिओ हा तिचा नवरा असल्याने त्याने तिची बाजु घ्यावी असे तिला वाटत होते. पण तसे होत नव्हते. उलट भांडणात तो रोविनालाच मारहाण करीत होता. तो ही तिच्यावर आत्याचार करीत होता. भांडणात नको नको ते तिला बोलत होता. खरे तर रोविनाचा स्वभाव हा भांडखोर आणि चिडखोर होता.ती कुणालाच समजून घेत नव्हती. तिच्या हेकेखोर स्वभावाने ती जास्तच आत्या सासुच्या बरोबर भांडत होती. ती आपल्याच घरात राहून आपल्यालाच दम दाखवते आणि घराबाहेर काढण्याची भाषा करते याचा त्या दोघींना ही राग येत होता. म्हणून त्या दोघी ही तिला जास्त काही न बोलता भाचा ज्युलिओ याला बोलत होत्या. ज्युलिओ याला बसून खायची सवय लागल्याने त्याला आपल्या आत्याचे म्हणणे पटत होते. तो त्यांच्या हो ला हो म्हणत होता. याचा त्याची बायको रोविनाला राग येत होता. ऐतखाऊ नवरा दुसऱ्याच्या आश्रयाला राहिल्याने तिला ही त्याचा राग येत होता. खरे तर त्याचे भांडण काही मोठे नव्हते. किरकोळ कारणातून भांडण होत होते. आत्या सासू आणि तिच्यात दोन पिढीचे अतंर असल्याने कुणी ही कुणाला समजून घेत नव्हते. दिवसे दिवस हे किरकोळ भांडण वाढतच चालले होते. त्या भांडणात रोविना ही एकाकी पडत होती. तिचा स्वभाव गुण तिला गप्प बसू देत नव्हाता.अलिकडे तर ती भांडणात त्या दोघींना मारायला ही जात होती. ज्युलिओची मात्र काही करू शकत नव्हता. कधी एकदा या भांडणाचा सोक्षमोक्ष लागतो असे त्याला झाले होते.त्याला एकीकडे बायकोला सांभाळावे लागत होते. तर दुसरीकडे आत्यांचे बोलणे ऐकूण घ्यावे लागत होते. त्याची परिस्थीत बिकट झाली होती.तर रोविनाला ही कधी या दोघी म्हाताऱ्या मरतात आणि आपली सुटका होते असे वाटत होते. पण त्या दोघी लवकर मरतील ही असे तिला वाटत नव्हते. त्यामुळे ती जास्तच वैतागलेली होती. यातून मार्ग काढण्यासाठी म्हणून तिने या दोघींना ही आपल्या मार्गातून बाजुला काढण्याचा विचार केलेला होता. यासाठी तिने काळजीपूर्वक प्लॅन केला होता.घटनेपूर्वी तिने म्हपासाच्या बाजारातून एक कोयता ही विकत आणला होता.आपल्या एकटीच्या हातून हे काम होणार नाही हे तिने ओळखून याकामासाठी तिने आपल्या ओळखीच्या आसगाव येथील सुमाननुर महमंद राज्याबली या तरूणाची मदत घेण्याचे ठरविले. त्याला भेटुन तिने त्याला या कामासाठी तयार केले. दोघी आत्या सासुंना मारून आपण ही आत्महत्या करणार असल्याचे त्याला सांगून या कामासाठी त्याला ३० हजार रुपये देण्याचे मान्य केले. त्याच्याशी बोलणे करीत असताना तिने त्याला या कामाचे टोकन म्हणून ५०० रूपये ही दिले होते. या दोघींना त्यांच्याच मारून जर पैसे मिळणार असतील आणि रोविना ही आत्महत्या करणार असेल तर आपण या गुन्हयात अडकणार नाही असे नुर महंमदला याला वाटले म्हणून तो ही या कामासाठी तयार झाला. त्या दोघांनी या दुहेरी हत्येचा प्लॅन केला आणि त्यांनी तो अमंलात आणण्यासाठी कंबर ही कसली. कसे ही करून या दोघी आत्या सासूंना मारून आपण निवांत राहावे असे तिला वाटत होते. घटनेच्या दिवशी म्हणजे रविवार दि.१४ नोव्हेंबर २०२० रोजी सायंकाळी ७.३० दरम्यान रोविनाचा पती ज्युलिओ हा भांडण काढून दारू पिण्यासाठी बाहेर गेला होता. अगोदरच भांडण त्यात तिच्या रागाचा पारा जास्तच चढला होता. नेमकी हिच संधी साधून तिने मित्र सुमाननुर मंहमदला आपल्या घरी बोलावून घेतले घरातील दोन्ही मुलांना तिने झोपचे औषध देवून दुसऱ्या खोलीत झोपवले. तो पर्यत रात्रीचे ९.३० वाजले होते. तिच्या आत्या सासू ही त्यांच्या बेडरूममध्ये झोपायला गेल्या होत्या. नवरा ही अजून बाहेरून आला नव्हता. सुमाननुर मंहमद आल्यानंतर तिने घरातील वीज पुरवठा बंद केला. घरातील लाईट गेल्याने मार्ता लोबो या कशातरी लाईट का गेली? हे बघण्यासाठी म्हणून हातात बॅटरी घेऊन बाहेर आल्या होत्या. अंधारात त्यांना चालायला ही येत नव्हते. याच संधीचा फायदा घेत नुर मंहमंद याने तिच्या डोकीत कोयत्याने वार केला. त्यासरशी त्या मोठयाने किचांळून ओरडल्या. त्यांचा आवाज ऐकून बेडरूममध्ये झोपलेली त्यांची दुसरी बहिण वेरा लोबो या ही बाहेर आल्या. त्यावेळी नुर याने तिच्यावर ही कोयत्याने वार केला. त्यासरशी ती ही रक्ताच्या थारोळ्यात पॅसेजमध्ये पडली.या दोघांचा ओरडण्याचा आवाज ऐकून घरात झोपलेल्या रोविनाच्या मुली जाग्या होऊन बाहेर ओरडत आल्या..आणि शेजारच्या घरात पळत गेल्या. त्या दोघांच्या ओरडण्याचा आवाज ऐकू आल्याने आणि त्या दोघींचा ओरडण्याच आवाज आल्याने शेजारी ही घटनास्थळी आले होते. ते येण्यापूर्वीच रोविना ही आपला मित्र सुमाननुर महंमद याच्याबरोबर स्कुटरवरून घटनास्थळावरून पळून गेली होती.कुणी तरी या घटनेची माहिती हणुजुण पोलीसांना दिली होती. घटनास्थळी ज्युलिओ हा देखिल आला होता.पोलीसांनी या दुहेरी खूनाची माहिती त्याच्याकडून घेतली होती. घरात त्याची बायको नसल्याने पोलीसांचा संशय तिच्यावर बळावला होता.घटना कोणत्या कारणातून घडली आणि यातील संशयीत आरोपी कोण आहेत याची माहिती जवळपास पोलीसांना मिळाली होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह गोमॅको इस्पितळात शवविच्छेदना साठी पाठवून दिला होता.या घटनेचा पोलीस तपास करीत असताना या घटनेतील पळून गेलेली रोविना व तिचा मित्र सुमाननुर मंहमद यांना घटनेनंतर काही वेळातच पोलीसांनी ताब्यात घेतले होते. त्यांना पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या दुहेरी हत्येची चौकशी केली असता.दोघांनीही आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली होती. दरम्यान या घटनेची फिर्याद ज्युलओिो याने पोलीसात दिली होती. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी मार्ता क्लोमिटोना लोबो (वय६४) व वेरा लोबो (वय ६२) या दोघीच्या हत्येचा गुन्हा रोविना ज्युलिओ लोबो (वय २९) व तिचा मित्र सुमाननुर महमंद राज्यावल्ली (वय २०) याचे विरूध्द भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदविला होता. त्या दोघांनी ही गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी त्याना म्हापसा येथील कोर्टात उभे केले असता. मा.कोर्टाने त्या दोघांना सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला होता.दरम्यान या घटनेतील नुर मंहमद हा या घटनेनंतर कर्नाटकातील आपल्या मुळ गावी हावेरी येथे पळून जाणार होता.परंतु या दोघीच्या हत्येनंतर ही रोविनाने त्याला राहिलेले २९,५०० रुपये दिलेले नव्हते.ती ही त्याला पैसे देण्याचे अमिष दाखवून थांबवून घेत होती. व मी ही तुझ्या बरोबर पळून येते असे सांगत होती. परंतु त्या दोघांचा पळून जाण्याचा प्लॅन पोलीसांनी उधळून लावला होता.ते दोघे ही पळून जाण्या अगोदरच पोलीसांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या होत्या.या घटनेचा तपास पोलीस उपाधिक्षक गजानन प्रभु देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुरज गावस व त्याच्या सहकाऱ्यांनी यशस्वी रित्या करून आरोपीना ताब्यात घेतले होते. कोणते भांडण कुठेपर्यत न्यायचे याचे भान असायला हवे या भांडणात कुणी तरी एकाने पहती बाजू घेतली तर होणारी अघटित घटना टाळता येते. परंतु ज्याचा स्वाभावच भांडखोर आणि हेकेखोर असतो अशा व्यक्तीमुळे भांडण हे विकोपाला जाते.त्यामुळेच क्षणीक रागाच्या भरात त्याच्या हातून पूर्वनियोजीत घटनेला मूर्त स्वरूप दिले जाते.हेच या घटनेवरून दिसून येते.

23 TO 29 NOV 2020 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 21/11/2020 7:58 PM Page 1



# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळास सरकारने पॅकेज द्यावे; सचिन साठेंची मागणी




**लातूर/प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळास विद्यमान सरकार व मागील सरकारनेही निधी दिलेला नाही. हे महामंडळ बंद पडण्याच्या मार्गावर असून ते पुनरुज्जीवित करण्यासाठी सरकारने पॅकेज घोषित करावे, अशी मागणी मानवहीत लोकशाही पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केली. सचिन साठे यांनी समाजाचे विविध प्रश्न आणि महामंडळाच्या समस्यांच्या अनुषंगाने मराठवाडा दौरा सुरू केला आहे. त्यानिमित्त लातूर येथे आले असता ते पत्रकारांशी बोलत होते.

सचिन साठे यांनी सांगितले की, देश स्वतंत्र झाल्यापासून मातंग समाज अन्याय सहन करत आहे. राज्यातील विद्यमान सरकार आणि मागच्या सरकारनेही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळास निधी दिलेला नाही. कोरोनामुळे समाजबांधव अतिशय संकटात सापडलेले आहेत. त्यातून बाहेर पडल्यानंतर समाजाला आता मदतीची गरज आहे. मातंग बांधवांना इतर कुठल्याही माध्यमातून मदतीचा हात मिळत नाही. अशा काळात महामंडळ हे एकमेव आशास्थान आहे. सरकारने निधी न दिल्यामुळे हे महामंडळ बंद पडण्याच्या मार्गावर आहे. महामंडळ बंद पडून अण्णाभाऊ साठे यांच्या नावाची बदनामी होऊ नये यासाठी आपण हा दौरा आयोजित केला आहे. ते म्हणाले की, महामंडळ वाचवण्यासाठी महामंडळ बचाव कृती समितीची स्थापना केली आहे. या प्रश्नासंदर्भात सामाजिक न्याय मंत्र्यांसोबत आपली चर्चा झालेली असून लवकरच निधी प्राप्त होईल अशी आशा आहे. परंतु कोरोनामुळे निधी देण्यावरही निर्बंध आहेत. अशा स्थितीत महामंडळाला पॅकेज जाहीर केले नाही तर आंदोलन उभे करू, असा इशारा त्यांनी दिला. सचिन साठे म्हणाले की, समाजावर आजही अन्याय अत्याचार होत आहेत. समाजबांधवांच्या जमिनी बळकावल्या जात आहेत. महिला व तरुणींची छेड काढली जात आहे.अशा वेळी सरकार आणि नेतृत्वाने निश्र्चित भूमिका घेण्याची गरज आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जन्मशताब्दी साजरी झाली. त्यासाठी तत्कालीन सरकारने १०० कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली होती. परंतु त्यातील १०० रुपये देखील खर्च झाल्याचे दिसले नाही, अशी टीकाही त्यांनी केली. मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांना आपला पाठिंबा आहे. समाजातील पदवीधरांचे प्रश्न त्यांनी सोडवलेले असून सतत लोकसंपर्कात राहणारे ते लोकप्रतिनिधी आहेत. त्यामुळे पदवीधरांनी सतीश चव्हाण यांच्या पाठीशी रहावे, असे आवाहनही त्यांनी केले. या पत्रकार परिषदेस कोअर कमिटीचे अध्यक्ष टी.एन.कांबळे, जिल्हाध्यक्ष रवी अर्जूने, एमवायएस संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुनील सौदागर, सुरेश चव्हाण यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# देवणीतील ४५ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**देवणी/शकिल मनियार**

तालुक्यातील ४५ ग्रामपंचायतच्या सरपंचपदाचे आरक्षण शुक्रवारी उपविभागीय अधिकारी विकास माने यांच्या अध्यक्षतेखाली सोडत पध्दतीने जाहीर झाले.तालुक्यातील काही नेत्याचे गावे सरपंचपदासाठी आरक्षित झाले असले तरी मांजरा काठावरील बहुतांश गावे सर्वसाधारण व सर्वसाधारण महिलेसाठी राहिल्याने पुढाऱ्यांचे पतीराज तरी अबाधित राहणार आहे.यावरुन कही खुशी कही गम चित्र आरक्षण सोडतीनंतर पहावयास मिळाले.

तालुक्यातील आरक्षण निहाय सरपंच पदाची गावे पुढील प्रमाणे अनुसुचित जाती पुरुष कोनाळी, माणकी, सावरगाव, देवणी (खु); तर अनुसुचित जाती महिला साठी हंचनाळ, बटनपुर, टाकळी, गुरनाळ, विळेगाव ही गावे आरक्षित झाली आहेत. अनुसुचित जमाती पुरुष आंबेगाव तर महिलासाठी कमालवाडी हे गावे आरक्षित झाले आहे.

नागरिकांच्या इतर मागास प्रवर्ग पुरुषसाठी नागराळ, दवणहिप्परगा, दरेवाडी, लासोना, भोपनी, नागतीर्थवाडी तर नामाप्रवर्ग महिलासाठी अचवला, बोळेगाव, धनेगाव, वागदरी, नेकनाळ, कमरोद्दीनपुर ही गावे आरक्षित आहे. सर्साधारण महिलासाठी डोंगरेवाडी, आनंदवाडी, अनंतवाडी, वलांडी, हेळंब, चवणहिप्परगा, संगम, अंबानगर, वडमुरंबी, हिसामनगर, इंद्राळ या गावात महिलाचा कारभार राहणार आहे. तर सर्वसाधारण जागेसाठी अजनी, कवठाळा, सिंधिकामट, गुरधाळ, गौंडगाव, होनाळी, तळेगाव (भो), बोरोळ, जवळगा, बोंबळी (खु), सय्यदपुर या सरपंचपद खुले राहिले आहे. शुक्रवारी झालेल्या आरक्षण सोडतीस उपविभागीय अधिकारी विकास माने, प्रभारी तहसिलदार इसामोद्दीन शेख, नायब तहसिलदार माडजे, सहा गटविकास अधिकारी अच्युत पाटील यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत

### पालघर जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाने बनावट मेल आयडी प्रतिसाद न देण्याचे आवाहन!



पालघर : पालघर जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांच्या नावाने एका अज्ञात व्यक्तीने बनावट मेल आयडी तयार केला असून हा मेल आयडी अधिकृत नसून यास कोणी कुठलाही प्रतिसाद न देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांनी केले आहे. .Dr.Manik Gursal I.A.Sexec.director 72mail.com अशा नावाने हा मेल आयडी असून जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांनी आपण कोणालाही मेल केला नसून अशा प्रकारच्या बनावट इमेल द्वारे फसवणूक टाळण्यासाठी त्यास प्रतिसाद देऊ नये असे आवाहन केले आहे. काही शासकीय अधिकाऱ्यांना या मेल आयडी वरून वैयक्तिक मेल गेल्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ यांना विचारणा केल्यावर हा प्रकार उघड झाला. या अज्ञात व्यक्ती च्या विरोधात सायबर सेल मध्ये तक्रार दाखल करण्यात आली असून झडख दीपाली लंभाते पुढील तपास करीत आहेत.

### पद्माकर आष्टेकर यांचे निधन



लातूर : चाकूर तालुक्यातील आष्टा येथील रहीवाशी पद्माकर विनायकराव आष्टेकर (भातलवंडे ) यांचे दि. २१ रोजी पहाटे निधन झाले. ते सा. क्राईम फोटो न्यूज पोर्टल चॅनलचे संपादक विष्णू आष्टेकर यांचे वडील होते. त्यांच्यावर शहरातील खाडगाव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पश्चात एक मुलगी, दोन मुले, सुना, जावाई, नातवंडे आसा मोठा परीवार आहे. शहरातील बार्शी रोड जवळील पद्मानगर येथे ते वास्तव्यास होते.

### नागोराव रणदिवे यांचे निधन



देवणी : देवणी तालुक्यातील देवणी (खुर्द) येथील नागोराव रणदिवे यांचे बुधवारी सांयकाळी साडेपाच वाजता निधन झाले. त्यांचे वय ७५ वर्षाचे होते. अचानक हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांचावर १९/११/२०२० रोजी वार गुरूवारी मांतग स्मशानभुमित अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. ते सामाजिक कार्यकर्ते शाम रणदिवे यांचे ते वडिल होते. अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या अचानक जाण्याने देवणी खु गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, पाच मुली, सुना नातवंड असा मोठा परिवार आहे.

### महावितरण कर्मचारी साधणार ग्राहकांशी संवाद

लातूर : लातूर शहरात एक दिवस एक वार्ड उपक्रमा अंतर्गत महावितरण कर्मचारी ग्राहकांशी संवाद साधनार आहेत. एक दिवस एक वार्ड हा उपक्रम सहव्यवस्थापकिय संचालक औरंगाबाद डॉ. नरेश गिते यांच्या आदेशानुसार चालू करण्यात आला आहे. मंगळवार १६ नोव्हेंबर २०२० पासून शहर शाखा क्रं. ७ अंतर्गत मुख्यअभियंता दिलीप भोले, कार्यकारी अभियंता गणेश सामसे, व अतिरिक्त का. अभियंता राजाभाऊ वडने यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवस एक वार्ड हा उपक्रम राबिण्यात येत आहे. या उपक्रमा अंतर्गत रोहीत्राची दुरुस्ती, तारा ओढणे, ग्राहकांच्या विज बिलाच्या तक्रारींचे निरसन करुन ग्राहकांना थकीत विज बील भरण्यासाठी प्रोत्साहीत तसेच बील भरुन घेणे, तारेला लागलेल्या झाडांच्या फांदृया तोडणे इत्यादी कामे करण्यात येत आहेत.एक दिवस एक वार्ड या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्यअभियंता दिलीप भोले, कार्यकारी अभियंता गणेश सामसे, व अतिरिक्त का. अभियंता राजाभाऊ वडने यांच्या मार्गदर्शनाखाली क्रं. ७ चे सहायक अभियंता दिपक पळसे, दस्तगिर शेख, प्रविण मोरे, करण धोत्रे, अविनाश गिरी, आतूल फावडे, श्रीमती पुनम कांबळे, वैशाली चिकटे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

### खाजगी बस, ट्रॅव्हल्सनी अधिक तिकिटदर आकारल्यास तक्रार करण्याचे आवाहन

लातूर : राज्य शासनाने कंत्राटी वाहनांचे (खाजगी बस, ट्रॅव्हल्स इ.) महत्तम भाडेदर निश्र्चित केले आहेत. शासन निर्णय प्रभावाने अमलात आला आहे. कंत्राटी बस परवाने धारकांकडून जर विहीत दरापेक्षा अधिक दराने आकारणी करण्यात येत असेल तसेच प्रवाशांना प्रवास करताना येणाऱ्या अडचणीबाबत mvdcomplaint. enf2gmail.com या ई-मेलव्दारे तक्रार नोंदविता येईल. तक्रारी संदर्भाने उचित चौकशीअंती संबंधित कंत्राटी बस परवाना धारकांना परवान्यावर निलंबनाची / रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल. या शासन निर्णयाव्दारे खाजगी कंत्राटी वाहनांना (खाजगी बस, ट्रॅव्हल्स इ.) गर्दीच्या हंगामाच्या काळात एस.टी. बससाठी येणाऱ्या प्रती किलोमीटर भाडे दराच्या ५० टक्के पेक्षा अधिक राहणार नाही. असे कमाल भाडेदर आकारता येईल. यापेक्षा अधिक भाडे आकारले गेल्यास प्रवाशांनी mvdcomplaint.enf2gmail.com वर तक्रार नोंदवावी , असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# स्व.पंतप्रधान इंदिराजी गांधींच्या जयंतीनिमित्त औशात युवक काँग्रेसतर्फे गरजूंना ब्लॅंकेट वाटप



**औसा/प्रतिनिधी**

भारत देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान स्व. इंदिराजी गांधी यांच्या जयंतीनिमित्त औसा तालुका युवक काँग्रेसच्या वतीने २५० गरीब व गरजूंना चादर आणि ब्लॅंकेट वाटप करून अनोख्या पद्धतीने जयंती साजरी करण्यात आली. युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सत्यजित दादा तांबे यांच्या सूचनेवरून युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष हनमंत राचट्टे यांच्या नेतृत्वात औसा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे गुरुवारी दि. १९ नोव्हेंबर २०२० रोजी सकाळी ११:०० वाजता भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या ज्येष्ठांच्या हस्ते हिवाळ्याचे दिवस असल्याने सुमारे २५० गरीब व गरजूंना ब्लॅंकेट व चादर अशा उबदार कपड्यांचे वाटप करण्यात आले. युवक काँग्रेसच्या वतीने प्रथमच दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या जयंतीनिमित्त आगळावेगळा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी जि प चे माजी सभापती अमरसिंह भोसले, प्रदेश सचिव अमर खानापुरे, माजी पंचायत समिती सभापती दत्तोपंत सूर्यवंशी, शहराध्यक्ष शकील शेख, जिल्हा निरीक्षक अभय देशमुख, युवक काँग्रेसचे औसा विधानसभा अध्यक्ष हनमंत राचट्टे, रौफ शेरकर, विश्वराज औटी, युवक काँग्रेस सरचिटणीस बजरंग बाजूळगे, धनराज जाधव, अजमेर शेख, इजहार सौदागर, केदार रेड्डी, अंकुर बनकर, रोहित भोसले यांच्यासह युवक काँग्रेसचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# अहमदपूरात १९ लाख ४२ हजाराचा गुटखा पकडला
## पोलीस निरिक्षक सुनिल बिर्ला यांची दमदार कामगिरी

**अहमदपूर/फिरोज शेख**

लातूर-नांदेड राष्ट्रीय महामार्ग वर तालुक्यातील गुगदळ शिवारात राज्य शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची वाहतूक करण्यात येत असल्याच्या गुप्त माहितीवरून अहमदपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांनी गुगदळ शिवारात धाड टाकून गुटख्याचा ट्रक व इतर वाहनासह १९ लाख ४२ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन याप्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

याविषयी सविस्तर माहीती अशी की, अहमदपूर शहरापासुन जवळच असलेल्या सहा ते सात किमी अंतरावरील लातुर- नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील गुगदळ शिवारात एका खाजगी वेअर हाऊस जवळ मंगळवारी रात्री अंदाजे १०:३० वाजण्याच्या सुमारास गुप्त माहीतीदाराच्या माहीतीवरून अहमदपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक सुनिल बिर्ला यांनी पोलीस नाईक भगवान गिरी , कैलास चौधरी, पोकॉ जुल्फीकार लष्करे, पोकॉ नारायण बेंबडे, पोकॉ रियाज देशमुख ठाणे अंमलदार शेख आदी कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन गुगदळ शिवारात छापा टाकला असता एम.एच २० एटी ६०३९ या मालवाहु ट्रकची झाडझडती घेतली असता ट्रकमध्ये प्रिमियम नजर ९००० गुटख्याचे




सिलबंद एकुण २२ पोते असा एकूण ७,९२,००० रूपयेचा गुटखा आढळून आला. पोलीसांनी सदरील घटनास्थळावरून पनीचा एम.एच १२के.पी ०३५३ क्रमांकाचा छोटा हत्ती किंमत अंदाजे १.५० लाख रुपये असा एकूण १९ लाख ४२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन ट्रक चालक रमेश कुंडगीर रा उत्तर रूई यास अटक करण्यात आली आहे. सदरील प्रकरणात चौघांविरूद्ध फिर्यादी अन्न निरिक्षक दयानंद पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अहमदपूर पोलिस ठाण्यात गुरनं ३५८/२०लम ३२८, १८८, २७२, २७३, ३४ भादवी सह कलम ५९ अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी बलराज मंजिले व पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय पाटील हे करीत आहेत

# ॲड.मनोहरराव गोमारे यांना विधान परिषदेवर घेण्याची मागणी

**लातूर/प्रतिनिधी**

थोर समाजवादी नेते ॲड. मनोहरराव गोमारे यांना विधान परिषदेवर सदस्य म्हणून नियुक्त करण्याची मागणी महाराष्ट्र विकास आघाडीचे प्रदेशाध्यक्ष ॲड.मंचकराव डोणे यांनी एका निवेदनातून राज्यपालांकडे केली आहे. या निवेदनात थोर समाजवादी नेते ॲड. मनोहरराव गोमारे हे सामाजिक व विधिज्ञ क्षेत्रात पन्नास वर्षा पेक्षा जास्त अनुभव असलेले ऋषीतुल्य सामाजिक नेत असून ज्यांनी उभ्या आयुष्यात कुठल्याही तत्वाची तडजोड न करता समाजवादी विचारसरणी अंगीकारून संबंध महाराष्ट्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. महाराष्ट्र विकास आघाडीचे व गोमारे साहेब यांचे काहीही संबंध नाहीत. परंतु एक राजकीय, सामाजिक उंचीचा कार्यकर्ता सभागृहात असावा. व त्यांच्या सामाजिक, राजकीय अनुभवाचा सभागृहाला फायदा व्हावा या उददांत हेतूने महाराष्ट्र विकास आघाडी ॲड. मनोहरराव गोमारे यांना राज्यपाल महोदयांनी विधानपरिषदेवर आमदार म्हणुन नियुक्त करावी अशी आग्रहाची मागणी करत आहे. सदरील निवेदनावर प्राचार्य रामदास माने, ॲड.एम.व्ही.माडगे, चंद्रकांत हजारे, सुभाष सरवदे आदी कार्यकर्ते यांच्या सहया आहेत.

# दवणहिप्परग्याचा प्रशांत सहाय्यक ग्यारीसन अभियंता लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतून निवड

**देवणी/शकिल मनियार**



देवणी तालुक्यातील दवणहिप्परगा येथील युवक प्रशांत राचोटी स्वामी यांची भारतीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षा द्वारे निवड होऊन भारतीय संरक्षण अभियांत्रिकी सेवा विभागात सहाय्यक ग्यारीसन अभियंता या पदावर मद्रास येथे निवड झाली आहे. त्याचे शालेय शिक्षण देशीकेंद्र विद्यालय लातूर तर आय आय टी हैदराबाद येथून २०१८ मध्ये बी टेक विशेष प्राविण्यात उत्तीर्ण होऊन त्याच वर्षी आखील भारतीय पातळीवरील गेट सारख्या परीक्षेत भारतात ५४ वा क्रमांकाने यश संपादन केले. तर त्याच वर्षी भारतीय अभियांत्रिकी लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत UPSC IES (union public service commission-Indian engineering services) अवघड परीक्षेत भारतात १०१ अशा अव्वल क्रमांकाने पास झाला. गेट परीक्षाच्या माध्यमातून चांगल्या पदावर अधिकारी पदावर निवड झाली होती. तेथे १० महिने वर्ग १ पदावर कार्यरत असताना णझडउ माध्यमातून वर्ग १ उच्च पदावर आक्टोंबर २०१९ साली अंतीम निवड झाली. नुकतेच मुंबई/ पुणे/हैदराबाद आदी ठिकाणी प्रशासकीय प्रशिक्षण संपल्यानंतर मद्रास येथे प्रथम नेमणूक झाली आहे. दवणहिप्परगा येथील रहिवासी माजी आदर्श शिक्षक तथा सांप्रत अभियंता वडील राचोटी चंद्रया स्वामी व आई उज्वला राचोटी स्वामी यांने आपल्या सुपुत्राला घडविले असून त्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल वलांडी येथील उद्योजक आनंद पाटील, चंद्रशेखर महाजन, माजी उपसभापती तुकाराम पाटील मोहम्मद रफी सय्यद जितेंद्र अंबुलगे यांनी संगमेश्वर स्वामी अभिनंदन करून नुकताच सत्कार केला. देवणी उदगीर परीसरातून प्रशांत स्वामी यांनी मिळवलेल्या या UPSC सारख्या परीक्षेतील यशामुळे निश्चितच नवीन पिढीला प्रेरणा मिळाल्याशिवाय राहणार नाही.

# भिवंडी इमारत दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना महापालिकेने केली आर्थिक मदत



**भिवंडी/प्रतिनिधी**

महानगरपालिका क्षेत्रातील पटेल कंपाऊंड येथील जीलानी बिल्डिंग दुर्घटना २१ सप्टेंबर रोजी घडली. या दुर्घटनेत ३८ जणांचा बळी गेला होता तर २१ जण जखमी झाले होते. या मृतांच्या वारसांना महाराष्ट्र शासन कडून ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली गेली परंतु ती आज रोजी पर्यंत मिळाली नसतानाच मागील महिन्यात झालेल्या ऑनलाईन महासभेत महापौर प्रतिभा पाटील यांनी मृतांच्या वारसांना ५० हजार तर जखमींच्या वारसांना २५ हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. आज महापौर दालनात महापौर प्रतिभा विलास पाटील यांच्या शुभहस्ते सदर रक्कमेच्या धनादेश वारसां कडे सुपूर्द केले. तर कोरोना काळात सेवा बजावताना कर्तव्यवरील महानगरपालिका अधिकारी कर्मचारी यांचा मृत्यु झाल्यास त्यांच्या वारसांना १० लाख रुपये सहाय्य जाहीर केले होते. आज त्यापैकी दोन कामगारांच्या वारसांना दहा लाख रुपयांची निधी देण्यात आली.

# निलंगा विधानसभा युवक काँग्रेसच्या वतीने इंदिरा गांधी यांची जयंती

**देवणी/प्रतिनिधी**



देशाला लाभलेले सक्षम नेतृत्व व भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची जयंती निलंगा विधानसभा युवक काँग्रेसच्या वतीने साजरी करण्यात आली. निलंगा विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष गजाननजी भोपणीकर यांच्या हस्ते श्रीमती इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. जयंतीनिमित्त निलंगा विधानसभा युवक काँग्रेसच्या वतीने ब्लँकेट वाटप करण्यात आले. यावेळी निलंगा विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष गजाननजी भोपणीकर तसेच गुरनाळ सोसायटीचे चेरमन अंकुश बागवाले, बोंबळीचे मा.सरपंच माधव भोसले, सुभाष माने, निलंगा विधानसभा युवक काँग्रेस सरचिटणीस अंकुश माने, धनराज मंथोळे, पंढरी टेकाळे, ईलाही अत्तार, दत्ता पाटील यांच्या सह देवणी तालुक्यातील इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

C M Y K

# कोरोनाची दुसरी लाट वास्तव की सरकारी अफवा?

या वर्षी कोरोनाने संपूर्ण जगाची वाट लावली आहे. एकट्या भारतात कोरोनाचे ९० लाख रुग्ण आहेत. त्यातील जवळपास ४ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. कोरोनाचे हे संकट भारतात मार्च पासून सुरु झाले आणि त्यानंतर कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सरकारने जो लॉकडाऊन केला होता त्याने देशातील प्रत्येक माणसाचे आणि देशाच्या अर्थ व्यवस्थेचे सुद्धा कंबरडे मोडून टाकले आहे. पण साधारण जुलै, ऑगस्ट नंतर नाईलाजाने का होईना उद्योगधंदे सुरू करावे लागले आणि त्यानंतर सध्या सुरू असलेल्या नोव्हेंबरपर्यंत जनजीवन हळू हळू पूर्व पदावर येऊ लागले होते. कोरोनाचा मृत्यू दर कमी झाला होता आणि कोरोनामुक्त होणाऱ्यांची संख्या ही वाढली होती. तर कोरोना बधितांची संख्या काही प्रमाणात घटली होती. त्यामुळे २०२१च्या सुरवातीला जर कोरोना प्रतिबंधक लस उपलब्ध झाली, तर देशाला कोरोना मुक्त करता येईल असा सरकारचा अंदाज होता. पण लोकांनीच सरकारचे गणित बिघडवले. कारण दिवाळीच्या खरेदीसाठी लोकांनी जी मोठ्या प्रमाणावर बाजारात तसेच रस्त्यावर गर्दी केली होती. त्या गर्दीत काही कोरोना बाधित सुद्धा मिसळलेले होते. त्यामुळे दिवाळीनंतर कोरोना बाधितांची संख्या इतकी वाढली की अहमदाबाद सारख्या शहरात पुन्हा लॉकडाऊन करावे लागले. दिल्लीमध्ये तर कोरोना आऊट ऑफ कंट्रोल झालाय. त्यामुळे तिथे मेडिकल इमार्जन्सी लागू करण्याच्या विचारात केजरीवाल सरकार आहे. कारण तसे केले तरच दिल्ली शहर कोरोनाच्या प्रकोपातून वाचू शकते. मुंबईत तेवढी वाईट परिस्थिती नसली तरी चांगलीही स्थिती नाही. त्यामुळे सरकार चिंतेत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून मुख्यमंत्री उध्दव ठाकरे सांगत आहेत की कोरोना बाबत सावधगिरी बाळगा गर्दीत जाणे टाळा, मास्क नेहमी वापरा हात स्वच्छ धुवा. त्यासाठी सरकारने माझे कुटुंब माझी जबाबदारी ही मोहीम राबवली. कारण कोरोणाची दुसरी लाट येणार आहे. त्यापासून जर स्वतःला वाचवायचे असेल तर कोरोना प्रतिबंधक लस उपलब्ध होईपर्यंत सरकारच्या नियमांचे पालन करायलाच हवे. पण लोकांना कोरोनची दुसरी लाट म्हणजे अफवा वाटत होती. सरकार लोकांना भीती दाखवत आहे असा लोकांचा समज झाला होता आणि म्हणूनच लोकांनी दिवाळीत सगळे नियम झुगारून मार्केट मध्ये रस्त्यावर गर्दी केली आणि त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला दिवाळी नंतर कोरोना बाधीतांची संख्या वाढली. त्याचा वैद्यकीय सेवांवर आता तान येऊ लागलाय. आणि आता हळूहळू पुन्हा मार्च ते जून सारखी परिस्थिती निर्माण होऊ लागलीय. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची ही एक प्रकारे चाहुलाच म्हणावी लागेल अशा स्थितीत कोरोणाची ही दुसरी लाट रोखण्यासाठी सरकारकडे लॉकडाऊन शिवाय दुसरा पर्याय नाही. लोकांनाही कळायला हवे की सगळ्याच गोष्टी सरकारवर सोपवून नाही जमत. नागरिक म्हणून आपली सुद्धा काही तरी जबाबदारी असते. कोरोनाच्या काळात सुरवातीला आपण ती पाळली, पण नंतर मात्र आपल्याला जमले नाही. अर्थात त्यात नागरिकांचाही दोष नाही. शेवटी माणसाच्या पोटापाण्याचा प्रश्न असल्याने लोकांना धोका पत्करून घराबाहेर पाडावेच लागले. कारण काम धंदा नसेल तर पैसा कुठून येणार आणि पैसा नसेल तर घरदार चालवायचं कसं? त्यातच कोरोनाच्या काळात सुरू असलेल्या लॉकडाऊनमध्ये काही उद्योग धंदे कायमचे बंद झाले. लोकांच्या नोकऱ्या गेल्या, त्यामुळे उपासमारीची पाळी आली. कोरोना पेक्षा लॉकडाऊनचे दुष्परिणाम भयानक होते. त्यामुळे पुन्हा तशी वेळ येऊ नये अशी प्रत्येक जण ईश्वर चरणी प्रार्थना करतोय. आणि म्हणूनच सरकार कडून कोरोनाच्या दुसऱ्या लाटेची शक्यता वर्तवली जातेय. तेंव्हा ती अफवा की वास्तव असा काही काळ संभ्रम निर्माण झाला होता. पण दिवाळी नंतर देशात जे कोरोनाचे चित्र दिसू लागले आहे ते चिंताजनक आहे. आणि हे चित्र पाहता कोरोनाची दुसरी लाट येऊ शकते. यावर आता विश्वास बसू लागलंय. त्यामुळेच लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. आपण दिवाळीच्या खरेदीसाठी विनाकारण घराबाहेर पडून बाजारात किंवा रस्त्यावर गर्दी केली. याचा आता लोकांना पश्चाताप होऊ लागलंय. कारण काही पाश्चिमात्य देशांमध्ये लोकांना दिलेली सवलत तिथल्या सरकारच्या अंगाशी आल्याने पुन्हा लॉकडाऊन करण्यात आलाय. आणि आता भारतात सुद्धा तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. पण भारतासारख्या गरीब देशाला पुन्हा लॉकडाऊन परवडेल का? हाच खरा प्रश्न आहे. मुळात गर्दी टाळण्यासाठी सरकारने ज्या ज्या उपाय योजना केल्या होत्या त्या लोकांनी पाळणे आवश्यक होते पण तसे झाले नाही. आजही या देशातील एक समुदाय असा आहे की तो मास्क वापरत नाही. खुलेआम रस्त्यावर फिरतोय पण पोलिस त्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे अशालोकांच्या माध्यमातून कोरोनाचा फैलाव अधिक होण्याचा धोका आहे. तेंव्हा सरकारने आता तरी या समुदायाकडे लक्ष देऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अन्यथा जे तब्लिकिंमुळे देशात झाले तेच पुन्हा होईल आणि निष्पाप लोक कोरोनाला बळी पडतील.




**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

राजकारण आणि राजकारण्यांचा आजवरचा इतिहास पाहता विश्वासार्हता आणि त्यांचा दुरान्वये ही संबंध नाही. तरी सुद्धा लोक त्यांच्यावर विश्वास ठेऊन स्वतःच्या पायावर का धोंडा पाडून घेतात तेच कळत नाही. सध्या वीज ग्राहकांच्या बाबतीत सुद्धा असेच झाले आहे. लॉकडाऊनच्या काळात लोकांच्या नोकऱ्या गेल्या. त्यामुळे काही लोक मुंबई सोडून गावी गेले. त्यानंतरच्या पाच-सहा महिन्यांच्या कालावधीत त्यांनी वीज वापरली नाही. अशा लोकांना वीज कंपन्यांनी एक लाख ते दीड लाख रुपयांची वीज बिले पाठवली. त्यामुळे वीज ग्राहकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. हा सरळ सरळ अन्याय होता. त्यामुळे जनप्रक्षोभ उसळणे स्वाभाविक होते. पण लोकांनी या फसवणुकीच्या विरोधात वीज कंपन्यांना न्यायालयात खेचायला हवे होते. मात्र तसे केले नाही. तर वीज ग्राहकांचा प्रक्षोभ थांबवण्यासाठी ऊर्जा मंत्र्यांनी वीज बिल माफ करण्याचे आश्वासन दिले होते. इतकेच नाही तर १०० युनिट पर्यंत वीज माफ केली जाईल असेही जाहीर केले होते. आजकाल राजकारणी लोक कोणताही मागचा पुढचा विचार न करता सवंग लोकप्रियतेसाठी कसलीही आश्वासने देतात आणि जेंव्हा त्या आश्वासनांची पूर्तता करणे अशक्य असल्याचे त्यांच्या लक्षात येते मग घुमजाव करून लोकांची फसवणूक करतात. ऊर्जा मंत्री नितीन राऊत यांनी सुद्धा तेच केले आहे. अगोदर वीज बिल माफ करण्याचे आश्वासन दिले आणि आता वीजबिल माफ करणे शक्य नसल्याने लोकांनी रीडिंग नुसार आलेले वीज बिल भरायलाच हवे असे फर्मान काढले. म्हणजे ज्यांनी वीज वापरलीच नाही तरीही त्यांना एक लाख रुपये वीज बिल आले ते त्यांनी डोळे झाकून भरावे असे ऊर्जा मंत्र्यांचे म्हणणे असेल तर ही काही मोगलाई नाही की सत्ताधाऱ्यांनी काहीही आदेश द्यायचे आणि लोकांनी ते एकायचे असे कदापि होणार नाही. कारण या देशात लोकशाही आहे आणि सर्वसामान्य जनता हीच या लोकशाहीचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे राज्यात सत्ता कुठल्याही पक्षाची असो. सरकारला लोकांची आर्थिक पिळवणूक करता येणार नाही. वीज बिल माफ करण्यासारखी सरकारची आर्थिक स्थिती नाही हे ऊर्जा मंत्र्यांना अगोदर ठाऊक नव्हते का? आणि ठाऊक होते तर मग वीज बिल माफ करण्याचे आश्वासन का दिले? आज सरकारची परिस्थिती मंदिरा बाहेर बसलेल्या भिकाऱ्या सारखी आहे. सरकारवर साडेसहा लाख कोटींचे कर्ज आहे. कर्मचाऱ्यांचा पगार देण्यासाठी सरकारला दर महिन्याला कर्ज काढावे लागत आहे. सरकार केंद्राच्या मदतीकडे डोळे लाऊन बसले आहे. असे असताना ऊर्जा मंत्र्यांनी वीज बिल माफ करण्याचे आश्वासन दिले कसे? ही एक प्रकारे वीज ग्राहकांची फसवणूकच आहे. त्यामुळे या फसवणुकीच्या विरूद्ध वीज ग्राहकांनी लोकशाही मार्गाने आंदोलन तर करावेच पण त्याने काय होणार आहे? फारतर सरकार वीजबिलात काही प्रमाणात सूट देईल. पण ग्राहकांना भरमसाठ वीजबिले पाठवून ग्राहकांची आर्थिक लुबाडणूक करणाऱ्या वीज कंपन्यांच्या विरोधात ग्राहकांनी न्यायालयात धाव घेतली तर कायद्यानुसार न्यायालय त्यांच्यावर कारवाई करील त्यांना दंड आकारून काही दिवसांसाठी त्यांचा वीज वितरणाचा परवाना स्थगित करण्याचा आदेश देईल आणि कदचित न्यायालय सुधा वाढीव वीजबिल माफ करण्याचे आदेश देईल. केवळ वीज कंपन्यांवरच न्यायालय कारवाई करील असे नाही, तर वीजबिल माफ करण्याचे खोटे आश्वासन देणाऱ्या ऊर्जा मंत्र्यांवरही फसवणुकीच्या गुन्ह्याखाली न्यायालय कारवाई करू शकते. म्हणूनच वीज बिल माफीसाठी आंदोलन करण्याबरोबरच वीज कंपन्या, वीज नियामक आयोग आणि ऊर्जामंत्री यांना ग्राहकांनी न्यायालयात खेचले तर भविष्यात ते ग्राहकांच्या आयुष्याशी खेळ करण्याची चूक करणार नाहीत.

महाराष्ट्रात वीज तुठवड्याची समस्या ही आजकालची नाही, तर गेल्या अनेक वर्षांपासूनची आहे. आघाडी सरकारच्या काळात तब्बल साडेपाच हजार मेगावॉट इतका वीज तुटवडा होता. त्यामुळे ग्रामीण भागात दहा ते बारा तासांपर्यंत भार नियमन असायचे. त्याचा सर्वाधिक परिणाम शेतीवर होत असे. कारण कृषी पंपांना पुरेशी वीज उपलब्ध होत नव्हती. परिणामी शेतीला पाणी मिळत नव्हते. त्यामुळे पीक करपून जात होती. आता विजेची कमतरता तितकीशी नाही. तरीही विजेची मागणी आणि पुरवठा याचा अजूनही ताळमेळ बसलेला नाही. या सगळ्या गोष्टी हळू हळू सुधारता येतील. पण वीज कंपन्यांचा गलथानपणा आणि त्याचा ग्राहकांना होणारा त्रास आणखी किती दिवस सुरू राहणार आहे. विजेचा वापर आणि त्याच्या तुलनेत येणारी भरमसाठ बिले याला सर्वस्वी वीज अभियंते जबाबदार आहेत. कारण अनेक ठिकाणी मीटरमध्ये झालेल्या बिघडाबाबत ग्राहकांनी तक्रारी करूनही वीज कंपन्यांचे अधिकारी किंवा अभियंते लक्ष देत नाहीत. त्यामुळे मीटर फास्ट चालत असेल किंवा त्यात आणखी काही खराबी असेल, तर वापरलेल्या युनिट पेक्षा जास्त रीडिंग दाखवल्या जाते आणि भरमसाठ वीजबिले येतात. हे थांबवण्याचे काम ऊर्जा खात्याने नाही का? ऊर्जा खाते आणि ऊर्जा मंत्र्यांनी झोपा काढायच्या आणि वीज ग्राहकांनी वाढीव बिलांचा भुर्दंड सहन करायचं हे किती दिवस चालणार?

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

इंटरनॅशनल सर्वायव्हर ऑफ सुसाईड लॉस डे विशेष

## आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त होण्यासाठी मानसिक व भावनिक आधाराची आवश्यकता!

### आत्महत्येच्या विचाराने ग्रासलेल्यांसाठी कनेक्टिंग स्वयंसेवी संस्थेकडून मोफत हेल्पलाईन

कोरोना महामारीमुळे ओढवलेले आर्थिक संकट, बेरोजगारीचा प्रश्न, कौटुंबिक वाद-विवाद, नैराश्य भावना यामुळे आत्महत्येच्या विचाराने ग्रासलेल्यांची संख्या मोठी आहे. आत्महत्येचा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर पुन्हा त्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये, यासाठी आत्महत्येच्या प्रयत्नातून बचावलेल्या लोकांना मानसिक-भावनिक आधार देण्याची आवश्यकता असते. अशा लोकांना आत्महत्येच्या विचारांपासून परावृत्त करण्यासाठी, तसेच त्यांना जगण्याची उमेद देण्यासाठी 'इंटरनॅशनल सर्वायव्हर ऑफ सुसाईड लॉस डे' (दि. २१ नोव्हेंबर) साजरा करण्यात येतो. या लोकांकरिता पुण्यातील कनेक्टिंग स्वयंसेवी संस्थेच्या वतीने मोफत हेल्पलाईन कार्यरत आहे.




'टेलिफोनिक इमोशनल सपोर्ट टू सुसाइड सरव्हायवर्स' ही सेवा दर बुधवारी आणि शुक्रवारी दुपारी ३ ते ५ या दरम्यान कार्यरत असते. या सेवेमध्ये कनेक्टिंग ट्रस्टकडून आत्महत्याग्रस्त लोकांना फोनव्दारे आधी वेळ घेण्यासाठी (अपॉईंटमेंटसाठी) संपर्क साधला जातो, त्यांच्या संमतीने अपॉईंटमेंट ठरवल्यानंतर दुपारी ३ ते ५ या दरम्यान त्यांना फोनव्दारे मानसिक-भावनिक आधार दिला जातो. ज्यांना धोका अधिक त्यांना प्राधान्य देऊन २४ तासांत पुन्हा फोन केला जातो. आत्महत्याग्रस्त व्यक्ती अपॉईंटमेंटसाठी ८४८४०३३३१२ या क्रमांकावर एसएमएस (SMS) करू शकतात. एसएमएसमध्ये नाव, संपर्क क्रमांक, कोणी आत्महत्येचा प्रयत्न केला आहे किंवा आत्महत्येमुळे जवळची व्यक्ती गमावली आहे, आदी माहिती विचारली जाते. हा सर्व तपशील गोपनीय ठेवण्यात येतो (काही कायदेशीर अपवाद वगळता). तातडीने बोलायचे असल्यास आमच्या डिसट्रेस हेल्पलाईनवर ९९२२००४३०५/ ९९२२००११२२ (रोज दुपारी १२ ते रात्री ८) यावर फोन करू शकता. 'लक्षात ठेवा, तुम्ही एकटे नाहीत. कनेक्टिंग ट्रस्ट आहे तुमचे ऐकून घेण्यासाठी, तुम्हाला समजून घेण्यासाठी!' हा कानमंत्र आम्ही लोकांपर्यत पोहोचवत आहोत, अशी माहिती कनेक्टिंग ट्रस्टच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लियान सातारवाला यांनी दिली.

लियान सतारावाला म्हणाल्या, कोरोना महामारीमुळे तसेच लॉकडाउन काळात लोकांना आजारपण, बेरोजगारी, अपयश, निराशा, एकटेपणा या समस्यांमध्ये वाढ झाली. खचल्यामुळे मनात आत्महत्येचा विचार, तसेच प्रयत्न केला गेला. अशांना लोकांना आत्महत्यतेच्या विचारापासून परावृत्त करण्यासाठी आत्महत्याग्रस्त (सुसाइड सरव्हायवर) आधार दिवस साजरा केला जातो. आत्महत्याग्रस्त लोकांना भावनिक आधार देण्याचा प्रयत्न याव्दारे केला जातो. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, आत्महत्येचा विचार करणाऱ्या २० व्यक्तिमधील एका व्यक्तीचा आत्महत्येमुळे मृत्यू होतो. जे आत्महत्येचा प्रयत्न करतात, ते पुन्हा असा प्रयत्न करण्याची शक्यता अधिक असते. आत्महत्याग्रस्त किंवा सुसाइड सरव्हायवरचे तीन प्रकारचे असू शकतात. यामध्ये ज्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला आहे, ज्यांच्या कुटुंबातील किंवा जवळच्या नात्यामधील कोणीतरी आत्महत्यामुळे मरण पावले आहे किंवा ज्यांनी आत्महत्या होताना, झालेली पहिली आहे अशा लोकांचा यामध्ये समावेश असतो.

भावनिक आधार देण्यासाठी कनेक्टिंग ट्रस्टच्या माध्यमातून काम सुरु आहे. यासाठी ट्रस्ट 'सरव्हायवर सपोर्ट प्रोग्राम' (SSP) राबवत आहे. या अंतर्गत टेलिफोनिक इमोशनल सपोर्ट टू सुसाइड सरव्हायवरस् (SSP-TESSS) हा एक नवीन उपक्रम सुरू केला आहे. आत्महत्याग्रस्त लोकांचे प्रमाण अधिक आहे, अशा बऱ्याच जणांना वेळीच आवश्यक तो आधार मिळत नाही. बदनामी हे त्यामागील कारण आहे. परंतु आता कनेक्टिंग ट्रस्ट हे पुणे पोलिस आणि ससुन रुग्णालयाच्या सहकार्याने थेट आत्महत्याग्रस्त लोकांपर्यत पोहचतात. कोणताही सल्ला न देता, आत्महत्याग्रस्त व्यक्तीविषयी कोणत्याही प्रकारचे मत न बनवता, समानुभूतीने आणि अनुकंपेने आशा व्यक्तीचे दुःख ऐकून, समजून घेतले जाते, असेही त्यांनी नमूद केले.

**महत्वाची हेल्पलाईन : टेलिफोनिक इमोशनल सपोर्ट टू सुसाइड सरव्हायवर्स (८४८४०३३३१२)**

## प्रेरणेचा प्रकाश पसरवणारी आगळीवेगळी मोघा गावची आनंदमय दिवाळी साजरी!

**अहमदपूर/प्रतिनिधी**

अहमदपूर तालुक्यातील मोघा गावात दिपावलीचे औचित्य याधून गावातील यशवंत, गुणवंत विद्यार्थी व कोरोना महामारीचा प्रार्दूभाव रोखण्यासाठी दिवसरात्र कष्ट करून गाव कोरोनामुक्त ठेवलेल्या कोव्हीड योध्दे यांचा सन्मान 'मोघाभूषण पुरस्कार' देऊन प्रेरणेचा प्रकाश पसरवणारी आगळीवेगळी दिवाळी साजरी करण्यात आली.

इतरांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने 'आपण गावचं, समाजाचं काही देणं लागतो' या निखळ भावनेतून या उपक्रमाची सुरुवात गावातील सुशिक्षित व उपक्रमशील युवकांनी केली आहे. त्याचबरोबर गावातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलांसाठी 'स्पर्धा परीक्षा ग्रंथालय' सुरू करण्यात येणार आहे. आणि पुढे त्याचेच रूपांतर स्वतंत्र, सुसज्ज अभ्यासिकेत करण्यात येणार आहे. अभ्यासासाठी प्रेरणा आणि अभ्यासासाठी सुविधा उपलब्ध करून देणे या दोन्ही गोष्टी यातून साध्य होणार आहेत. दिवाळीच्या सुट्टीत बाहेरगावी असणारे सर्वजण गावाकडे येतात. गावच्या लेकी येतात. त्यामुळे दरवर्षी भाऊबीजेच्या दिवशी सत्कार व व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमाचं यंदाचं हे दुसरं वर्ष ! या वर्षी कोरोनामुळे मोठा कार्यक्रम आयोजित करण्यास अडचण असल्यामुळे घरोघरी जाऊन त्यांचे आई-वडील/ पालक यांचा सत्कार करण्यात आला. मुलांच्या यशात सर्वाधिक वाटा हा आई-वडिलांचा



असतो. त्यामुळे मुलांच्या अगोदर मागील वर्षी प्रमाणे त्यांच्या आईवडिलांचा सत्कार करण्यात आला. घरोघरी जाणाऱ्या टीममध्ये अनेकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. आयोजकांनी सर्वांचं अभिनंदन करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या निमित्ताने गावंच या सर्वांच्या आनंदात सहभागी झालं. कुटुंबातील सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद, समाधान आणि आपल्या पाल्याचा अभिमान झळकत होता. त्यांच्यासाठी ही दुहेरी दिवाळी होती. आनंदाचा फराळ देणाऱ्यांच्या आणि घेणाऱ्यांच्या सर्वांच्या वाट्याला आला. बालासाहेब सखाराम कदम, संभाजी सकनुरे, शरद जाधव-सकनुरे, दिनकर वर्तळे, नेताजी कदम, राम संपत्ती कदम, विद्यासागर गायकवाड, सचिन देवानंद कदम, बाळासाहेब रामा कांबळे, अनिरुद्ध कदम, रवी हारगिले, राहुल कांबळे यांच्या पुढाकाराने आणि रोहिदास शेळके, किशोर लोहकरे, रामदास शेळके, बाळू मच्छिंद्र कदम, राहुल दिलीप कदम, तुकाराम मुरलीधर कदम यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

## यूपीएससी मुख्य परीक्षा व मुलाखतीची तयारी करणाऱ्या अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना मिळणार आर्थिक सहाय्य

**मुंबई/प्रतिनिधी**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) नागरी सेवा मुख्य परीक्षेची व मुलाखतीची तयारी करणाऱ्या अनुसूचित जमातीतील उमेदवारांसाठी या वर्षापासून आर्थिक सहाय्य करण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांना दरमहा १२ हजार रुपये विद्यावेतन व १४ हजार रुपये पुस्तक खरेदीसाठी असे एकूण २६ हजार रुपये देण्यात येणार असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री ॲड. के.सी. पाडवी यांनी दिली. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये तसेच अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांचे प्रशासकीय सेवेत प्रमाण वाढावे, यासाठी आदिवासी विकास विभागाचे मंत्री श्री. पाडवी यांनी ही योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत यूपीएससीच्या पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन मुख्य परीक्षेची तयारी करणाऱ्या २५ व मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखतीची तयारी करणाऱ्या २५ अशा अनुसूचित जमातीमधील एकूण ५० उमेदवारांना ही आर्थिक मदत मिळणार आहे. सन २०२०-२१ पासून ही योजना लागू होणार असून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत या विद्यार्थ्यांची निवड करून थेट त्यांच्या बँक खात्यात रक्कम वितरीत करण्यात येणार आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षांमध्ये अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, या समाजातील जास्तीत जास्त तरुणांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करावी व प्रशासकीय अधिकारी व्हावे, यासाठी हा निर्णय घेतला आहे. आर्थिक सहाय्याअभावी स्पर्धा परीक्षेपासून वंचित राहणाऱ्या अनुसूचित जमातीमधील तरुणांसाठी या योजनेचा नक्कीच लाभ होईल, असा विश्वास पाडवी यांनी व्यक्त केले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# लुटमारीच्या टोळीतील आरोपी नाशिक एलसीबीने केला जेरबंद

**नाशिक/क्राईम रिपोर्टर**

नाशिक शहरातील व्यापाऱ्याची काही दिवसांपुर्वी टोळीकडून लुटमार करण्यात आली होती. या लुटीत रोख रक्कम, दागीने तसेच इनोव्हा कार अशा मुद्देमालाची लुट करण्यात आली होती. या लुटमारीतील एक गुन्हेगार नाशीक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शिताफीने जेरबंद केला आहे.



नाशिक शहरातील व्यापारी उमेश चंद्रकांत गाडे हे १६ नोव्हेंबर रोजी रात्री अडीच वाजेच्या सुमारास दहावा मैल परिसरातील ढाब्यावर जेवण करुन नाशिक शहराच्या दिशेने त्यांच्या ताब्यातील कारने जात होते. त्यावेळी अज्ञात चार इसम त्यांच्या कारजवळ आले. आम्हाला नाशीक पर्यत सोडता का? असे म्हणत ते त्यांच्या कारमधे बसले. कारमधे बसल्यानंतर चौघा गुन्हेगार व्यक्तींनी त्यांच्या डोक्याला पिस्टल व धारदार चॉपर लावला. त्यांचे डोळे बांधून त्याच्या खिशातील रोख रक्कम, हातातील चांदीचे कडे, चांदीची अंगठी व घडयाळ यासह त्यांच्या ताब्यातील इनोव्हा कार (एमएच १५ बीडी ८३२१) असा एकुण ०५ लाख ०५ हजार ४०० रूपयाच्या मुद्देमालाची लुटमार करण्यात आली होती. या लुटमार प्रकरणी दिंडोरी पोलिस स्टेशनला गु.र.न. २८४/२०२० भा.द.वि. ३९४, ३४ यासह आर्म ॲक्ट ३/२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शखेचे पो.नि. के.के. पाटील आपल्या पथकाच्या मदतीने या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते. तपासादरम्यान या गुन्हयातील अज्ञात आरोपी लुटीतील इनोव्हा कारसह नाशिक शहराच्या दिशेने गेल्याचे पथकाच्या लक्षात आले. महामार्गावरील सीसीटीव्ही कॅमे-यात तसे आढळून आले होते. गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीनुसार गुन्हेगार मुंबईकडे गेल्याचे पथकाला समजले होते. तपास पथकाने मुंबईच्या अंधेरी, वसई-विरार परिसरात सलग दोन दिवस पाळत ठेवली. अखेर पथकाला या गुन्हयातील इनोव्हा कारचा शोध लागला. लुटीतील इनोव्हा कार वसई येथील एव्हरशाईन बिल्डींगच्या खाली उभी दिसल्याने तपास पथकाला आढळून आली. पथकाने सापळा रचुन गाडीतील इसमांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. मात्र ते सतर्क झालेल्या चालकाने भरधाव वेगाने कार पळवली. पोलिस पथकाने त्या कारचा पाठलाग सुरु केला. गर्दीचा फायदा घेत आरोपींनी गाडीच्या खाली उतरुन झोपडपट्टी परिसरात पळून गेले. त्या जागेवरुन पथकाने ती कार ताब्यात घेतली. त्यानंतर पथकाने मुंबई पोलीसांच्या मदतीने जुहू पोलीस स्टेशन हद्दीतून सराईत गुन्हेगार अमन हिरालाल वर्मा, (३५) समतानगर, गुलमोहर क्रॉसरोड, अंधेरी वेस्ट, मुंबई यास ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली असता त्याने या गुन्ह्याची कबुली दिली. त्याने नाशिक जेलरोड, नाशिकरोड परिसरातील त्याच्या इतर साथीदारांच्या मदतीने केलेल्या या लुटमारीची कबुली दिली. पोलिस पथकाने ताब्यातील कारची झडती घेतली असता त्यात एक देशी बनावटीचे पिस्टल, दोन जिवंत काडतुसे, चॉपर, धारदार कोयते, स्कु ड्रायव्हर असा एवज मिळून आला. तो एवज जप्त करण्यात आला.

ताब्यातील आरोपी अमन वर्मा याच्या नाशिकरोड परिसरातील साथीदारांनी नाशिक शहराच्या उपनगर परिसरात दिवाळीच्या दुस-या दिवशी एका इसमाचा धारदार शस्त्राने खुन केल्याचे या तपासात निष्पन्न झाले आहे. अटकेतील आरोपी अमन वर्मा याचेविरुध्द मुंबई शहरातील विविध पोलीस स्टेशनला घरफोडी, चोरी यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याच्या इतर साथीदारांचा शोध सुरु आहे. नाशिक ग्रामीण पोलिस अधिक्षक सचिन पाटील तसेच अप्पर पोलिस अधिक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली या लुटमारीचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. के.के.पाटील व त्यांचे सहकारी पो.उ.नि. मुकेश गुजर, सहायक फौजदार रविंद्र शिलावट, हे.कॉ. दिपक अहिरे, पोलिस नाईक संदिप हांडगे, अमोल घुगे, हेमंत गिलबिले, पो.कॉ. सचिन पिंगळे, प्रदिप बहिरम आदींनी उघडकीस आणला आहे.

# सव्वा कोटी रुपयांच्या मौलवान धातूची घरफोडी

## १२ तासात मुद्देमाल जप्त करण्यात नारपोली पोलिसांना यश, तीन आरोपी अटक



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी पोलीस उपायुक्त क्षेत्रातील गोदाम पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर घरफोडीच्या घटना घडत असतानाच नारपोली पोलीस ठाणे हद्दीतील वळगाव येथील गोदमातून घरफोडी करून चोरीस गेलेल्या १ कोटी,३५ लाख,१ हजार ९१२ रुपयांचा १२.३ टन वजनाचा मौल्यवान धातू घरफोडीची घटना घडल्यानंतर १२ तासात या घरफोडीतील तीन आरोपींना अटक करण्यात नारपोली पोलीस ठाण्यातील गुन्हे पथकाने यश मिळविले आहे.



वळगाव येथील माँ पद्मावती कॉम्प्लेक्स येथील नोंनफेरस मेटल या कंपनीचे गोदाम असून या गोदामात ८ नोव्हेंबर च्या रात्री शटरचे लॉक तोडून गोदामातील टंगस्टन कार्बाईड या नावाचे १२.३ टन वजनाचे मौल्यवान धातू चोरीस गेल्याचे मालक निखिल नरेंद्र दुबल यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी नारपोली पोलीस ठाण्यात १२ नोव्हेंबर रोजी तक्रार नोंदविल्या नंतर पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रशांत ढोले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मालोजी शिंदे, पोलीस निरीक्षक गुन्हे रवींद्र वाणी यांच्या मार्गदर्शना खाली गुन्हे पथकातील पो उप निरीक्षक पुष्पराज सुर्वे, पो हवा. अशोक बोडके, पो.ना.राजेश गावडे,लक्ष्मण सहारे, पो.शि.सुनील शिंदे, प्रवीण सोनवणे, पारस बाविस्कर, विजय ताठे या पथकाने गुप्त बतमीदाराच्या माध्यमातून मोबाईल चा तांत्रिक तपास करीत अवघ्या १२ तासात राहनाळ येथून या गोदामात काम करणारा सोहनसिंग राजपूत व त्याचे साथीदार भंगार व्यावसायिक तारासिंह भैरवसिंह परमार ,हिरासिंह भैरवसिंह परमार या दोघा भावांना राहनाळ येथून एकूण तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी सदरची घरफोडी केल्याचे कबुल केले असून त्यांच्या कडून चोरी केलेला सर्वच्या सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# ठाणे आरटीओमधील कनिष्ठ लिपिक चौकशीच्या फेऱ्यात

**भिवंडी/प्रतिनिधी**

ठाणे आरटीओ कार्यालयातील कनिष्ठ लिपिक विकास परबत चौकशीच्या फेऱ्यात सापडला असून त्याच्या गैरवर्तुणुकीची चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश परिवहन आयुक्त कार्यालयाने ठाणे येथील प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र गायकवाड यांना दिले असून त्यामुळे ठाणे आरटीओ कार्यालयात खळबळ माजली आहे.

**ठाणे परिवहन आयुक्त कार्यालयाचे कारवाईचे आदेश**



याबाबतचे सविस्तर वृत्त असे की विकास परबत इसम ठाणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून नियुक्त आहेत. ते पदाने जरी कनिष्ठ असले तरी त्यांचे राजकीय वजन फार मोठे असल्याने व ते आर्थिक देवाण-घेवणीत माहीर असल्यामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालयात त्यांचा दबदबा मोठा आहे असे बोलले जात आहे. परंतु विकास परबत यांच्या गैरवर्तुणुकीची चौकशी करून परबत यांनी शासकीय काम व शासकीय कर्तव्या बाबत कर्तव्यपालनात केलेल्या कसुरी बद्दल त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होण्यासाठी राष्ट्रीय मानव हक्क मंचचे अध्यक्ष शरद धुमाळ यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे निवेदन सादर केले होते. विकास परबत ठाणे येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात कार्यरत असतांना दुचाकी वाहनांना नोंदणी क्रमांक देताना फार मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होऊन शासनाचे लाखो रुपयांचे महसूल हानी झाल्याची बाब धुमाळ यांनी त्यांच्या निवेदनाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. शासनाने धुमाळ यांचे निवेदन बाबत गंभीर दखल घेऊन कनिष्ठ लिपिक विकास परबत त्यांचेवर कारवाई करण्याचे निर्देश दिल्यामुळे ठाणे आरटीओ कार्यालयात खळबळ माजली आहे. प्रस्तुत प्रकरणी प्रादेशिक परिवहन अधिकारी रविंद्र गायकवाड यांच्याशी संपर्क साधला असता कनिष्ठ लिपिक विकास परबत यांची चौकशी करून कारवाई करण्याबाबत परिवहन आयुक्त यांचेकडून आदेश प्राप्त झाले असून या प्रकरणी स्पष्ट अहवाल सादर करण्यात येईल असे गायकवाड यांनी आमचे प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

# तीन वर्षांच्या मुलीचे अपहरण

**वाडा/प्रतिनिधी**



तालुक्यातील पालसई या गावातील रहिवासी बापू नारायण सोनवणे यांची ३ वर्षाची मुलगी कु. पल्लवी बापू सोनवणे हिन्दुकुंभार समाजातील आहे. ११ नोव्हेंबर २०२० रोजी सायंकाळच्या सुमारास रस्त्यावर खेळत असतांना कुणीतरी अज्ञात व्यक्तीने तिला खाऊचे अमिष दाखवून पळवून नेल्याची घटना घडली आहे. नातेवाईक व इतर ठिकाणी शोध घेतला असता ती सापडली नाही. या बाबत वाडा पोलीस ठाण्यात १४ नोव्हेंबर २०२० रोजी अज्ञाता विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा रजिस्टर नं.२५७/२०२० भादंडवी कलम २६३ अन्वये नोंद झाली असून कुणास फोटोत दिसणारी मुलगी आढळून आल्यास वाडा पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन तपास अधिकारी वाडा पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार यांनी केले आहे.

**क्राईम Reporter**
**9890718873**
औरंगाबाद, कोल्हापूर, सातारा, परभणी, सांगलीतील बातम्या व गुन्हे कथा या क्रमांकावर पाठवा

# इंदिरा गांधी जयंतीनिमित्त कोकण भवन येथे अभिवादन!



**नवी मुंबई/प्रतिनिधी**

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान, भारतरत्न स्व.इंदिरा गांधी यांची १०३ व्या जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त कोकण भवन येथे अभिवादन करण्यात आले. उपायुक्त विकास गिरीश भालेराव यांनी स्व.इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसोबत राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतली. स्व.इंदिरा गांधी यांनी देशाची स्वतंत्रता, एकता, अखंडता, सार्वभौमता टिकवण्यासाठी जीवनभर कार्य केले. त्यासाठी प्राणाचे बलिदान दिले. त्यांच्या कार्याचे व बलिदानाचे स्मरण करत असतांना आपआपसातील वाद, मतभेद शांततेच्या मार्गाने मिटवण्याचा व संपूर्ण देश हिंसाचारमुक्त करण्यासाठी प्रत्येक भारतीयांचे योगदान असेच महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त देशाचे स्वतंत्र्य व राष्ट्रीय एकात्मता अबाधित ठेवण्यासाठी तसेच अधिक दृढ करण्यासाठी निष्ठापूर्व कार्य करण्याची शपथ आज कोकण भवन येथील अधिकारी व कर्मचारी यांनी घेतली. यावेळी गिरीश भालेराव उपायुक्त (विकास), मनोज रानडे उपायुक्त (सामान्य) आदि अधिकारी उपस्थित होते. उपस्थितांनी सोशल डिस्टन्सिंगसह मास्क आणि सॅनिटाईझरचा योग्य वापर केला. याप्रसंगी कोकण भवनमधील विविध कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# कर्तव्य बजावताना कोरोनाने मृत्यू झालेल्या ग्रामीण भागातील १७ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ५० लाख रुपयांची मदत

**मुंबई/प्रतिनिधी**

कर्तव्य बजावताना कोरोनाचा संसर्ग झाल्याने मृत्यू झालेल्या ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या विविध पदावरील १७ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ५० लाख रुपयांची विमा रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून संबंधीत कर्मचाऱ्यांच्या वारसांना तातडीने मदत देण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी पत्रकार परिषदेत दिली.



ग्रामविकास मंत्री मुश्रीफ म्हणाले की, कोरोना संकटकाळात ग्रामीण पातळीवरील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी, मिनी अंगणवाडी कार्यकर्त्या, अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्त्या, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, सीएससी कंपनीचे केंद्र चालक, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत कंत्राटी पद्धतीवरील कर्मचारी, कामगार, जिल्हा परिषद कर्मचारी यांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्यात आले होते. हे सर्व कर्मचारी कोरोना संक्रमण काळात ग्रामीण भागातील संक्रमण रोखण्यासाठी जीवाची बाजी लावून काम करत होते. लोकांमध्ये जावून जनजागृती करत होते. माझे कुटुंब, माझी जबाबदारी अभियानाची अंमलबजावणी करण्यामध्ये या कर्मचाऱ्यांनी महत्वाचे योगदान दिले. गृहभेटी करणे, ऑक्सीमीटर-थर्मामीटर आदींच्या सहाय्याने लोकांची तपासणी करणे अशी विविध कामे करताना कर्तव्यावर असताना दुर्दैवाने काही अधिकारी, कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण होऊन त्यांचा मृत्यू झाला. अशा कर्मचाऱ्यांच्या वारसांना मदत देण्यात येत आहे, असेही मुश्रीफ यांनी सांगितले.

प्राप्त प्रस्तावांपैकी मुकेश वणवे, रोजंदारी मजुर (जि. भंडारा), बाळासाहेब वैराळ, ग्रामविकास अधिकारी (जि. अहमदनगर), रमेश गोळे, ग्रामपंचायत कर्मचारी (जि. पुणे), श्रीराम गवारे, ग्रामविकास अधिकारी (जि. ठाणे), बबन तरंगे, शिपाई कम क्लार्क (जि. पुणे), मारुती पारींगे, वाहन चालक (जि. रायगड), राहूल कांबळे, उपविभागीय जलसंधारण अधिकारी (जि. सांगली), नरेंद्र बावा, ग्रामविकास अधिकारी (जि. जळगाव), प्रकाश सोनवणे, ग्रामविकास अधिकारी (जि. पुणे), लक्ष्मण टिपुगडे, नळ पाणीपुरवठा कर्मचारी (जि. कोल्हापूर), सुनिल शेंडे, विस्तार अधिकारी (जि. नागपूर), सतिश फेरन, ग्रामपंचायत कर्मचारी (जि. अमरावती), संतोष धाकड, ग्रामसेवक (जि. अमरावती), परशुराम बढे, ग्रामपंचायत कर्मचारी (जि. पुणे), दिलीप कुहीटे, विस्तार अधिकारी (जि. नागपूर), सुभाष गार्डी, शिपाई (परिचर) (जि. सातारा), आणि प्रशांत अहिरे, ग्रामसेवक (जि. अहमदनगर) या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा कर्तव्य बजावताना कोरोनाने दुर्दैवी मृत्यू झाला. या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ५० लाख रुपये इतकी विमा कवच मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे. लवकरच जिल्ह्याचे पालकमंत्री किंवा जिल्हाधिकारी किंवा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते मदतीचे वितरण करण्यात यावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. घरातील कमावती व्यक्ती गमावल्याने संकटात सापडलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या संकटकाळात मदत देण्याचा हा प्रयत्न आहे. याशिवाय कर्तव्य बजावताना कोरोनामुळे मृत्यू झालेल्या इतर अधिकारी, कर्मचारी यांच्या वारसांना विमा कवच मदत मिळण्यासाठीचे प्रस्ताव ३० नोव्हेंबरपर्यंत पाठविण्याच्या सूचना जिल्हा परिषदांना देण्यात आल्या असल्याचे मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले.

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'बी' विरार पुर्व, मुख्य कार्यालय-विरार**
**(दुरध्वनी क्रमांक ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३)**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुबंई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'बी' कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र | पावती क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | तुळींज-७ | NL07/467/46 | ४७१ | रविन्द्र पाटील | जागृती संजय राठोड |
| २. | तुळींज-२ | NL02/722/24 | ४७३ | सुजित सत्यचरण मैती | प्रशांत धुमाळ/ |
| ३ | तुळींज-२ | NL02/379/26 | ४७५ | दिलशाद अहमद सिद्दिकी | अब्बास अली मो. नेदरीया/ |
| ४ | तुळींज-३ | NL03/776/9 | ४७७ | रघुनाथ शिवराम लाड | संजय शिवराम लाड/ |
| ५ | तुळींज-४ | NL04/367/27 | ४७८ | सनम कन्स्ट्रक्शन | रविंद्र मानदेव तुपट/ |
| ६ | तुळींज-७ | NL07/495/27 | ४८० | स्वाती बालकराम सोलकर | नलिनी मधुकर घरत/ |
| ७ | तुळींज-३ | NL03/645/56 | ४८३ | तपस्या बजाज | ज्योती बजाज/ |
| ८ | तुळींज-१ | NL01/79/6 | ४८५ | संचिता दिलिप घैसास | स्वप्नाली अशीष खुशे/ |
| ९ | तुळींज-३ | NL03/797/11 | ४८७ | विनय मखोदर यादव | सुलेखा फरीद शेख/ |
| १० | तुळींज-३ | NL03/797/19 | ४८९ | विनय मखोदर यादव | विरेन्द्र राय/ |
| ११ | तुळींज-२ | NL02/919/71 | ४९१ | सचिन रिकामे | मनाली मनोज खाडे व मनोज शंखर खाडे/ |
| १२ | तुळींज-२ | NL02/707/54 | ४९४ | सुधाकर व्यंकटेश पुजारी | असगरी बेगम नियाज अहमद अंसारी/ |
| १३ | तुळींज-२ | NL02/528/56 | ४९९ | रविन्द्र शंकर शिंदे | सुनिता सुधीर जाधव/ |
| १४ | तुळींज-४ | NL04/417/86 | ५०१ | रोबटो आर. फर्नांडिस | माग्रेट आर. फर्नांडिस/ |
| १५ | तुळींज-२ | NL02/96/24 | ५०४ | संजय धोंडू खेडेकर | रानी देवी अरविंद कुमार मिश्रा/ |
| १६ | तुळींज-२ | NL02/570/15 | ५०६ | फकरूद्दीन खान | खुशनुमा अजीम सिद्दीकी/ |
| १७ | तुळींज-२ | NL02/856/33 | ५०८ | प्रदीप गुप्ता | मधु प्रदिपकुमार गुप्ता/ |
| १८ | तुळींज-२ | NL02/856/34 | ५११ | प्रदीप गुप्ता | मधु प्रदिपकुमार गुप्ता/ |
| १९ | तुळींज-२ | NL02/691/8 | ५१२ | गितादेवी रामश्रय यादव | प्रहलाद शंकर पाल/ |
| २० | तुळींज-२ | NL02/533/48 | ५१४ | भाईलाल रामजतन पासी | संतोष मारूती केरेकर/ |

जावक क्र. वविशम/कवि/६६०/२०२०-२०२१
दिनांक : १७/११/२०२०

सही/-
**सहा.आयुक्त**
प्रभाग समिती 'ब' विरार पुर्व
वसई विरार शहर महानगरपालिका

# औसा तालुक्यातील ७९ सरपंच पदे आरक्षीत

## महिलांसाठी ५५ सरपंच आरक्षित तर ३० पदे खुल्या प्रवर्गासाठी

**औसा/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील आज प्रशासकीय इमारत सभागृहात आरक्षण सोडत १०९ ग्रामपंचायत साठी २०२०-२०२५ या पाच वर्षासाठी काढण्यात आले. औसा रेणापूर उपविभागीय अधिकारी अविनाश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली करण मारुती कांबळे या लहान मुलांच्या हस्ते आरक्षणाच्या चिठ्ठ्या काढून काढण्यात आल्या. यात अनुसूचित जातीसाठी १९, अनुसूचित जमातीसाठी १, नागरिकाचा मागास प्रवर्ग २९ व खुल्या प्रवर्गातील महिला साठी ३० ग्राम पंचायत सरपंच पदाची सोडत काढण्यात आली. अनुसूचित जमाती साठी गांजनखेडा, अनुसूचित जाती महिलासाठी उटी बु, कमालपूर, खुंटेगाव, बोरगाव न, रामेगाव, जवळगा पो, एरंडी, चिंचोली काजळे, कुमठा तर अनुसूचित जाती सर्वसाधारणसाठी कोरंगळा, येळी, तावशीताड, दावतपुर, लखणगाव, उजनी, आलमला, तुंगी बू, किनिनवरे अशी २९ पदे आरक्षित आहेत.

नागरिकाचा मागास प्रवर्ग महिला टाका, वानवडा, देवताळा, बानेगाव, चिंचोली जोगण, कवठा लातूर, लोदगा, शिवली, मसलगा खु, येलोरी वाडी, हसाळा एकंबी, उंबडगा बु, फत्तेपूर, समदर्गा तर नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण गटासाठी करजगाव, गोंद्री, भुसनी, धानोरा, पारधेवाडी, उत्का, तपसे चिंचोली, भेटा, बेलकुंड, वांगजी अपचुंदा, लामजना, चलबुर्गा, भंगेवाडी अशी २९ पदे आरक्षित आहेत. तर सर्व साधारण महिला साठी बुधोडा, सेलू, किनी थोट, जयनगर, वाघोली, हसेगाववाडी, शिंदाळा जहागीर, सारोळा, खरोसा, कार्ला, जावळी, नागरसोगा, आशिव, गुळखेडा, येलोरी , येळवट, भादा, कावठा केज, काळमाथा, बोरफळ, बऱ्हाणपूर, शिंदाळावाडी, जायफळ, वडजी, मासूर्डी, मातोळा, कवळी, सिरसल हे ३० सरपंच पदे आरक्षित आहेत. तर तालुक्यातील मंगरूळ, हिप्परसोगा, हरेगाव, शिंदाळा लो, मोगर, तळणी, शिवणी लख, माळकोंजी, सारणी अंदोरा, नांदुर्गा, किल्लारी, चिंचोली सोन, हिप्परगा , माळुंब्रा एकंबी तांडा, गुबाळ, कन्हेरी, सत्तधरवाडी, होळी, आनंदवाडी, जमालपुर, तांबरवाडी, हासेगव, लोहटा, उंबडगा खु, हसलगण, शिवणी बु, याकतपूर या गावची सरपंच पदे खुल्या गटासाठी आहेत. या आरक्षण सोडतीस तहसीलदार शोभा पुजारी, नायब तहसीलदार वृषाली केसकर व शिवाजी कदम उपस्थित होते.

### हुतात्मा स्मारकाचे भूमिपूजन संपन्न

भिवंडी : गोरसई सावंदे येथे सन १९८३ रोजी कत्तलखाना बनविण्यात येणार होता मात्र या कत्तल खाण्यास स्थानिक नागरिकांनी जोरदार विरोध केला होता. या आंदोलना दरम्यान १८ नोव्हेंबर १९८३ रोजी झालेल्या गोळीबारात परिसरातील चार तरुणांचा मृत्यू झाला होता. अखेर या आंदोलनाची दखल घेत येथील कत्तलखाना रद्द करण्यात आला होता. या घटनेला तब्बल ३७ वर्ष झाली. या आंदोलनात मृत्यू झालेल्या तरुणांच्या स्मरणार्थ गावातील नागरिकांनी एकत्र येत गोरसई सावंदे येथे आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या चार तरुणांची आठवण म्हणून हुतात्मा स्मारक उभारण्याचे ठरविले असून या हुतात्मा स्मारकाचे भूमिपूजन बुधवारी विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. आंदोलनादरम्यान झालेल्या गोळीबारात मृत्यू झालेल्या गोरसई येथील हुतात्मा शुद्धोधन चन्ने, कालवार येथील हुतात्मा शांताराम म्हात्रे, शेलार येथील हुतात्मा चंदर मुकणे, गौरी पाडा येथील हुतात्मा लक्ष्मण हाडके या चार हुतात्म्यांच्या स्मरणार्थ हे हुतात्मा स्मारक बांधण्यात येणार आहे.

पान १ वरून....

### ब्लॅकमेलिंग त्याच्या अंगाशी आली...

गळा दाबुन हत्या केली असुन त्याचा मृतदेह गाडीच्या डिकीत मिळुन आला आहे, तर दिपक गोकलानी याला हिल लाईन पोलिसानी अटक केली आहे. उल्हासनगर कॅम्प ५ येथे राहणारा पवन अच्छरा (२५) हा १६ नोव्हेंबर पासुन बेपत्ता होता. तेव्हा त्याच्या वडीलानी हिल लाईन पोलिस ठाण्यात मिसींग दाखल केली होती. त्याच मिसींगच्या आधारे पोलिसानी तपास सुरु केला. दरम्यान काल नेताजी चौक येथील तळवळकर जिमच्या बाजुला एक सफेद रंगाची गाडी उभे असलेली पोलिसांना दिसली त्या गाडीच्या डिकीतुन दुर्गंधी येत असल्याने पोलिसांनी त्या गाडीची डिकी उघडली असता त्या डिकीत पवन याचा मृतदेह मिळुन आला. पोलिसानी मृतदेह ताब्यात घेवुन जे जे रुग्णालयात शवविच्छेना करिता पाठवला आहे. तर पोलिसानी पवनचा मित्र दिपक गोकलानी याला ताब्यात घेवुन त्याची अधिक चौकशी केली असता त्यानेच पवनचा गळा दाबुन हत्या केल्याची कबुली दिली आहे. गुन्हा कबुल करताना दिपक याने सांगितले की पवन हा पैशाची मागणी करत होता तर कोणता तरी व्हिडियो व्हायरल करन्याची धमकी दिली म्हणुन पवन ची हत्या केल्याची कबुली दिपक ने दिली आहे. दरम्यान दिपक ला हिल लाईन पोलिसानी या गुंह्यात अटक केली आहे.

### डोंगरीत खून करून दोघे वसईला पळाले...

पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. तसेच घटनास्थळी ॲम्ब्युलन्स बोलावून घेतली. पोलिसांनी घटनास्थळी उपस्थीत असलेल्या लोकांकडे त्या इसमा बाबत विचारपूस केली असता, गर्दीतून एक महिला पुढे आली. रूबीना मोहम्मद शेख (वय २७) असे या महिलेचे नाव होते. तिने सदर जखमी इसम हा आपल्या मावशीचा मुलगा असल्याचे पोलिसांना सांगितले .तसेच त्याचे नाव माजीद साजीद अली (वय २१) रा. विजय नगर झोपडपट्टी, वडाळा, मुंबई असे असल्याचे सांगितले. डोंगरी-१ मोबाईलने जखमी माजिद अली याला तात्काळ ॲम्ब्युलन्सने उपचाराकरीता सर जे.जे. रूग्णालयात घेवून गेले. रुग्णालयात कर्तव्यावरील डॉक्टर सौरभ कदम यांनी ०९:५० वाजताच्या सुमारास तपासून मयत घोषित केले. जखमी इसम मयत झाल्याने या बाबत डोंगरी पोलीस ठाण्यात गु.र.क्र. १७६/२० कलम ३०२, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास डोगरी पोलीस ठाण्याचे वपोनी संदीप भागडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पोपट साळुखे आणि गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि प्रकाश दिनकर, पोउनि अमित कुंभार, पोशि. इम्रान मुल्ला, अजित कदम, मुकेश सोनवणे, संदीप नाईक, आदी करू लागले. या पथकाने प्रथम घटना स्थळाजवळील असलेल्या एल अ‍ॅन्ड टी कंपनीचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज प्राप्त करून पाहिले असता, २५ आक्टोबर रोजी ०४:२३ वाजण्याच्या सुमारास दोन अनोळखी इसम यातील मयत इसम माजिद अली याला लाकडी काठीने मारहाण करीत असल्याचे दिसुन आले. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजमधील संशयित आरोपीची पाहणी करून त्यांची ओळख पटविण्यात आली.

दरम्यान आरोपीनी घटनास्थळावरून पळ काढल्याने त्यांच्या शोध घेण्यासाठी गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि प्रकाश दिनकर, पोउनि अमित कुंभार, पोशि. इम्रान मुल्ला, अजित कदम, मुकेश सोनवणे, संदीप नाईक हे वसई येथे रवाना झाले. या पथकाने सातवली, वसई (पुर्व), जि. ठाणे येथून गुन्हयातील संशयित आरोपी मंगेश कोंडर (वय ३५) व सुरज बोलके (वय २३) या दोघांना ताब्यात घेवून डोंगरी पोलीस ठाण्यात आणले. पोलीस ठाण्यात आणून त्याची चौकशी केली असता, किरकोळ भाडणातून त्यांनी मयत माजिद अली याचा खून केल्याची कबुली दिली. गुन्हयातील सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना या गुन्हयात अटक करण्यात आली. डोंगरी विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त अविनाश धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डोगरी चे वपोनी संदीप भागडीकर यांच्या नेतृत्वाखाली पोनि पोपट सांळुखे , पोउनि प्रकाश दिनकर, पोउनि अमित कुंभार, पोशि. इम्रान मुल्ला, अजित कदम, मुकेश सोनवणे, संदीप नाईक यांनी तपासात महत्वाची भूमिका पार पाडली.

### जमिनीचा वाद विकोपाला गेला...

भाऊ लागत होते. या दोन भावातील शेतीच्या आणि घराच्या जागेवरून नेहमीच भांडणे आणि मारामारी होत होती. तसे हे दोन्ही कुटूंबे ही सधन कुटुंबे म्हणून ओळखली जात होती. तरी ही या दोन पाटलाच्या कुंटूंबात शेत जमीनीचा वाद आणि घरादाराचावाद घुमसत होता. त्यातूनच हे प्रकरण कोर्टात गेले होते. कोर्टात हे प्रकरण बरीच वर्ष पडून असल्याने त्यातून काही मार्ग निघत नव्हता. यात कोणाच्या ही बाजून निकाल लागला तरी दुसरी विरोधी निकाल लागलेली पार्टीही वरच्या कोर्टात जाणार हे निश्चत होते. काही केल्या हा वाद मिटत नव्हता. त्यातूनच महेश पाटील याचा मुलगा विशाल उर्फ आप्पासो आणि सतिश पाटील या काका पुतण्यात बऱ्याच वेळेला भांडणे होऊन मारामारी ही झाली होती.विशाल हा तरूण असल्याने त्याच्या अंगातील रक्त सळसळत होते. त्याने या वादातूनच काका सतिश पाटील याला चांगलाच चोप दिलेला होता.त्यामुळे सतिश पाटील हे पुतण्या विशालवर चिडून होते. दोन्ही कुटूंबातील हा वाद इतका विकोपाला गेला होता की, यातून आता मार्ग निघणे शक्य नव्हते. काका आणि पुतण्या याच्यात तर विस्तव ही जात नव्हता. तरी ही ते दोघे समाजाला आणि गावाला दाखविण्यासाठी आपणच एकच आहोत हे दाखवत एकमेकाशी वरवर बोलत होते.

त्यातच महेश पाटील यांनी विशाल याला आपल्या वाटणीची एक इंच ही जमीन कुणाला सोडायची नाही. भले त्यासाठी रक्ताचे पाट वाहिले तरी चालतील असे बजावले होते. त्यामुळे विशाल हा सतिश याला भांडणात सारखा तुला बघूनच घेतो. तुला सोडत नाही अशी वारंवार धमकी देत होता. त्याच्या या धमकीला सतिश हा घाबरलेला होता.काहीही करून विशालचा कायमचा काटा काढायाचा नाही तर पुढे हा आपल्याला डोईजड होईल अशी भिती त्यांना वाटत होती. त्यातच त्याचा काटा काढल्यास आपला भाऊ महेश हा काही ही करू शकत नाही याची त्याला खात्री होती. विशाल जर आपल्या मार्गातून काढले तर आपला कायमचा संघर्ष मिटेल हे त्याला कळून चुकले होते. म्हणून त्याने विशालची गेम करायची आहे असे आपल्या मित्रांना सांगुन त्याना त्याच्या हत्येची सहा लाख रूपयांची सुपारी ही दिली होती. त्याला कसे मारायचे त्याच्या मृतदेहाची कशी विल्हेवाट लावायची याबाबत त्याने बेनाडीतील आपला मित्र अमोल प्रकाश वड्डुर याच्याशी सविस्तर चर्चा केली होती. त्याप्रमाणे त्या दोघांनी विशालच काटा काढणेसाठी म्हणून प्लॅन रचला होता. या कामात अमोल वड्डुर याने आपले मित्र दिलीप परशराम वड्डुर, विकास वकिल पाटील, बाबासाहेब पांडूरंग कांबळे याना मदत्तीला घ्यायचे ठरविले होते. या पाचजणांनी मिळून विशाल याला कुठे कसे मारायचे,त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट कशी लावायची आणि हे प्रकरण आपल्या अंगाशी येवू नये म्हणून काय करायचे हे सगळे व्यवस्थित ठरवले होते. दि.३० सप्टेंबर २०२० रोजी सतिश पाटील याने निपाणी ग्रामीण पोलीसात तक्रार दाखल केली की,आपला पुतण्या विशाल पाटील हा दि.२७ संप्टेंबर रोजी त्याची कार सर्व्हिसिंग करून आणतो असे सांगून घराबाहेर पडला तो अद्याप तीन दिवस झाले तरी घरी परतला नाही. अशी तक्रार त्याने दाखल केली.त्याच्या तक्रारीवरून पोलीसांनी विशाल पाटील हा त्याच्या कारसह बेपत्ता असल्याची तक्रार नोंद करून घेतली आणि तपासाला सुरूवात केली होती. निपाणी हे शहर कर्नाटक आणि महाराष्ट्र सिमेवर असल्याने निपाणी ग्रामीण पोलीस या घटनेचा तपास महाराष्ट्रात ही करत होते. कर्नाटकातील तसेच महाराष्ट्रातील सर्वच पोलीस ठाण्यांना बेपत्ता विशाल पाटील याची माहिती देवून काही माहिती असल्यास निपाणी ग्रामीण पोलीसांना कळविण्याचे आव्हान केले होते. गेल्या महिना दीड महिना पोलीस या घटनेचा तपास करत असताना फिर्यादी सतिश पाटील हा वारंवार निपाणी ग्रामीण पोलीस स्टेशनला येवून बेपत्ता विशाल पाटील याची चौकशी करू लागला होता. पोलीस ही त्याच्याकडून वेगवेगळ्या पध्दतीने माहिती घेत होते.त्याच्या बोलण्यात पोलीसांना विसंगती आढळून येत होती.

पोलीसांचा खरा संशय हा त्याचेवरच होता. पण पोलीस त्याला तसे दाखवत नव्हते. दुसऱ्या बाजूने ही पोलीस माहिती काढत होते. त्यावेळी पोलीसांना सतिश पाटील आणि बेपत्ता विशाला पाटील याचेत शेतजमीनीच्या आणि घराच्या हिस्सावरून आणि वाटणीवरून बऱ्याचवेळेला भांडणे आणि मारामारी झाल्याची माहिती मिळाली.पोलीस त्याच्या माघारी विशाल आणि फिर्यादी सतिश याचे मोबाईल कॉलचे रेकॉर्ड काढत होते.त्याचवेळी सतिश याने त्याच्या मोबाईलवरून त्याच्या मित्राशी विशालला संपविण्याबाबत चर्चा केल्याचे कॉल रेकॉर्ड मिळालेले होते.पोलीसांना हा पक्का पुरावा मिळाला होता. याच दरम्यान ९ ऑक्टोबंर २०२० रोजी सांगोला पोलीसांना मिरज पंढरपूर हायवेवरील जुनोनी येथे एक बेवारस कार मिळाली होती. पोलीस त्या कार मालकाचा शोध घेत असताना ती कार कर्नाटकातील निपाणी जवळील बेनाडी येथील विशाल पाटील याची असल्याची माहिती मिळाली होती.सांगोला पोलीसांनी याबाबत निपाणी पोलीसाशी संपर्क साधला होता.पोलीसांना बेपत्ता विशाल पाटील याची कार मिळाली होती.पोलीसांनी आता सुतावरून स्वर्ग काढण्याचा प्रयत्न केला होता.त्याना या घटनेत नक्कीच काही तरी काळेबेरे असल्याची शंका येत होती.पोलीसांनी मिळालेल्या कॉल रेकॉर्डवरून संशयीत म्हणून सतिश पाटील यालाच ताब्यात घेवून त्याच्याकडे बेपत्ता विशालची चौकशी सुरू केली होती.सतिश पोलीसांना मी त्या गावाचा नाहीच असे दाखवत होता.त्याच्या बोलण्यात विसंगती आढळत असल्याने पोलीसांनी त्याला बोलते करण्यासाठी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविला.ही मात्रा त्याला तंतोत लागू पडल्याने त्याने पोलीसांना बेपत्ता विशालचा खून आपणच आपल्या सहकारी मित्राच्या मद्‌तीने केल्याचे सांगून सगळा घटना क्रम सांगितला.त्याने दिलेल्या माहिती अशी की, त्याच्यात आणि विशाल पाटील याच्यात वर्षापुवर्ष शेतजमीनीच्या वाटणीवरून वाद होत होता. विशाल हा नात्याने त्याला पुतण्या लागत होता. विशालने या कारणातूनच त्याला बघून घेण्याची भाषा केली होती. त्याचप्रमाणे विशाल हा दारू पिवून येवून त्याला व सतिशची आई म्हणजे विशालची आजी हिला ही मारहाण करीत होता. त्याचप्रमाणे आणखीन जास्त वाटणी मागत होता.त्यातून त्याने मला मारण्याची धमकी दिलेली होती, म्हणून त्याने आपल्या मित्रांना सहा लाख रूपयांची त्याच्या हत्येची सुपारी दिली होती.दि.२७ ऑक्टोंबर २०२० रोजी विशाल हा घराशेजारी त्याची कार धुवत होता. त्यावेळी सतिश याने त्याला पोते उचलण्याचे बहाणा करून घरा पाठीमागील जागेत बोलावून घेतले होते. तेथे अगोदरच सतिश याचा मित्र अमोल हा होता. सतिश याने बोलवल्याने विशाल हा गेला होता.तेथे त्या दोघांनी त्याला लाथाबुक्कांनी मारहाण करून त्याचा गळा आवळला होता. त्यातच त्याचा मृत्यू झाला होता.संध्याकाळची वेळ असल्याने या घटनेची कुणाला खबर लागली नाही. त्यांनतर त्या दोघांनी त्याचा मृतदेह एका पोत्यात घालून त्याच्याच कारच्या डिकीत घातले.त्यानंतर त्या दोघांनी त्याची कार घेवून ते दोघे आणि त्याचे मित्र असे पाच जण मिळून कोल्हापूर जिल्हयातील गगनबावडा येथील घाटात आले होते.त्या घाटातील अनदूर गगनबावडा मार्गावर असणाऱ्या खोल दरीत त्यांनी त्याचा मृतदेह त्या पोत्यासह टाकून देवून तेथून पोबारा केला होता.त्याचा खून केल्यानंतर त्याने अमोल वड्डुर याचेसह त्यचाया इतर मित्रांना सुपारीतील दीड लाख रूपये दिले होते.शिवाय त्याच्या जेवणाची पिण्याची व्यवस्था केली होती. यानंतर त्यांनी त्याची कार घेवून गगनबावडा, मलकापुर, हातकणंगले,मिरज मार्गे नेत पंढरपुरकडे नेली होती.सांगोल्या जवळील जुनोनी हद्दीत त्यांनी त्या रात्री हायवे वरती त्याची कार सोडून तेथून मिळेल त्या वाहनाने मिरजेपर्यत येवून नंतर निपाणीला आले होते.त्याने ही माहिती दिल्यानंतर पोलीसांनी या घटनेतील इतर पाच ही आरोपींना अटक केले होते. विशाल उर्फ अप्पासो महेश पाटील (वय २५ रा. बेनाडी.ता.निपाणी) याचा खुन करून पुरावा नष्ट केले प्रकरणी मुख्य संशयीत आरोपी सतिश दादासाहेब पाटील,अमोल प्रकाश वड्डुर, रा.दोघेही बेनाडी.त्याचे मित्र दिलीप परशराम वड्डुर रा.व्हानाळी ता.कागल.महाराष्ट्र,विकास वकिल पायी,रा.खेबवडे ता.करवीर, कोल्हापूर, बाबसाहेब पांडुरंग कांबळे रा.व्हानाळी.ता.कागल यांना ही ताब्यात घेवून अटक करून त्याचे विरोधात आपीसी. कलम ३०२,२०१ या आणि इतर गुन्हांची नोंद करून त्याना निपाणी येथील कोर्टासमोर उभे केले असता. मा.कोर्टाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली होती. पोलीसांनी त्यांची रवानगी बेळगाव येथील हिंडलगा जेलमध्ये केली होती.

सदर घटनेचा तपास जिल्हा पोलीस प्रमुख लक्ष्मण निंबरगी, अतिरिक्त जिल्हा पोलीस प्रमुख अमरनाथ रेड्डी, डीवायएसपी मनोजकुमार नायक, यांच्या मार्गदर्शनाखाली सीपीआय संतोष सत्यनायक, फौजदार, बी.एस.तळवार, यांच्यासह एस.ए तोळगे. एस.आय.कंबार,असिगर तसिलदार, प्रकाश सावजी,संजय कारगौडर, कलगौंडा पाटील, प्रवीण करजणगी, श्रीशैल गळतगे, एल.एच .कोचरी यांनी तपास करून संशयीत आरोपीना बेडया ठोकल्या.संपत्तीचा वाद हा विकोपाला गेला की रक्ताचे नाते ही एकमेकांचे वैरी होतात.काही केल्या हा वाद मिटत नसल्याने ते एकमेकांच्या गळ्याचा नरडीचा घोट घेतात. हेच या घटनेवरून दिसून येते.

### नपुंसक पतीमधला विकृत नराधम...

योग कधी जुळून येईल याची चिंता तिच्या पिताश्रींना लागून होती. आपल्या कन्येच्या नशिबात कोणत्या गावचा राजकुमार आहे? त्याचे उत्पन्न भरदम असेल का? त्या राजकुमाराकडे आपली कन्या सुखी राहील का? असे एक ना अनेक प्रश्न कामिनीच्या पिताश्रींना नेहमी पडत होते. पिताश्रींची चिंता म्हणजे आपली चिंता असे समजून कामिनी स्वत:च तिच्यासाठी ऑनलाईन वरसंशोधन करत होती. समाजाच्या मॅट्रीमोनीयल संकेत स्थळावर ती दररोज व्हिजीट देत असे. तिचा स्वप्नातील आणि पिताश्रींच्या मनाला समाधान देणारा राजकुमार ती स्वत:च शोधत होती. जळगाव शहरातील एका सुसंपन्न कॉलनीत कामिनी आपल्या आईवडीलांसह रहात होती. समाजाच्या संकेत स्थळावरील एक स्थळ सर्वांना योग्य वाटले. त्या संकेत स्थळावरील उपवर तरुण जळगाव शहरातीलच रहिवासी होता. संकेत स्थळावरील उपवर तरुणाने दिलेल्या माहितीनुसार त्याचे वार्षिक उत्पन्न दहा लाख होते. त्या उपवर तरुणाचे कोचींग इंस्टिट्युट असल्याचे दर्शवण्यात आले होते. कामिनी जळगाव शहरातील रहिवासी होती. संकेत स्थळावरील त्या उपवर तरुणाचे आईवडीलांसह राहण्याचे ठिकाण देखील जळगाव होते. अलिखीत प्रथेनुसार कामिनीच्या जवळच्या नातेवाईकांनी त्या स्थळाची कानोसा घेवून माहिती घेतली. दिलेल्या पत्त्यावर त्या उपवर तरुणाचे घर आणि कोचींग इंस्टीट्युट असल्याची तसेच आर्थिक सुबत्ता असल्याची नातेवाईकांची खात्री झाली. तसेच तो तरुण कामिनीला मनोमन आवडला. त्यामुळे तिने देखील या स्थळाला होकार दिला. त्यामुळे मध्यस्त नातेवाईकांमार्फत ओळखीपाळखी काढून निमंत्रण देत पुढील पुरक बोलणी करण्यात आली. उपवर तरुणाची आर्थिक सुबत्ता लक्षात घेवून आपली मुलगी कामिनी सुखात राहील असा विचार तिच्या पालकांनी केला. दोन्ही पक्षाकडील मंडळी विवाहाच्या बोलणी प्रसंगी जमली. यावेळी समाजाच्या चालीरीतीनुसार तोळ्याच्या रुपात सोने व रोखीच्या रुपात लाखातील रक्कम आणि संसारोपयोगी वस्तू असा हुंडा वरपक्षाला देण्याचे ठरले. हा हुंडा जवळच्या चार नातेवाईकांसमक्ष वधू पक्षाने वर पक्षाला दिला. नियोजीत तारखेला कामिनीचे लग्न लॉकडाऊन काळात निवडक नातेवाईकांच्या हजेरीत झाले. लग्नानंतर कामिनी व तिच्या पतीने ब्राम्हणाच्या मदतीने, नातेवाईकांच्या साक्षीने श्री सत्यनारायणाची पुजाअर्चा केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी घरातच मधुचंद्राच्या रात्रीची बेडरुममधे तयारी अर्थात सजावट करण्यात आली. त्या रात्री कामिनी मनोमन खुष होती. ज्या रात्रीची प्रत्येक विवाहित तरुणी आतुरतेने वाट बघत असते ती रात्र आणि तो क्षण जवळ आला होता. मात्र त्या रात्री जे घडले ते कामिनीसाठी विचित्र होते. मधुचंद्राच्या रात्री तिच्या पतीने तिच्यासमोरच व्हियाग्रा नावाची प्रणयक्षमता अर्थात स्टॅमीना वाढवण्याची गोळी घेतली. नैसर्गीक प्रणयक्षमता वापरुन पतीने आपल्यासोबत समागम करावा अशी कामिनीची मनोमन इच्छा होती. मात्र आपल्या समक्ष पती प्रणयक्षमता कृत्रीम पद्धतीने वाढवण्यासाठी औषधी घेत असल्याचे बघून कामीनीला चुकीचे वाटले. तिने देखील नाईलाजाने आपली लज्जा बाजूला ठेवून त्याच्या या कृत्याला विरोध दर्शवला. त्यावर तिच्या पतीने तिला म्हटले की या गोळीमुळे प्रणयाची धुंदी वाढते. एक्स्ट्रॉ टाईम अर्थात प्रणयाचा जादा टाईम अर्थात बोनस वेळ मिळतो. स्त्री कंटाळून जाईल मात्र पुरुषाची धुंदी कमी होणार नाही अशी या गोळीची करामत असते. असे म्हणत कामिनीच्या पतीने ती व्हियाग्रा नावाची गोळी घेतली. मात्र गोळी घेवून देखील तिच्या पतीची क्षमता अजिबात वाढली नाही. जी नैसर्गीक क्षमता होती ती देखील खालावली. त्यामुळे पुन्हा एकवेळ आपली लज्जा बाजुला ठेवून कामिनीने त्याला विचारले की तुम्ही पुरुषात नाही काय? तिच्या बोलण्याचा त्याला राग आला. तु माझ्या पौरुषत्वावर संशय घेते असे म्हणत त्याने तिला मारहाण केली व काही वेळातच झोपून गेला. ती रात्र कामिनीने तळमळत काढली. आपण काय विचार केला होता आणि काय झाले असे म्हणत ती देखील पाय दुमडून झोपी गेली. दुसऱ्या दिवशी तिच्या पतीने तिच्यासोबत समागम करण्यासाठी एक कृत्रीम यंत्र (एक्स्टर्नल ऑर्गन व्हायब्रेटर) आणले. या यंत्राच्या वापरामुळे कामिनीच्या विशिष्ट अंगाला प्रचंड वेदना होवू लागल्या. त्या वेदना सहन झाल्या नाही म्हणून ती मोठ्याने ओरडू लागली. बाहेर आल्यावर तिने हा प्रकार तिच्या सासूच्या कानावर घातला. त्यावर तिच्या सासून उलट तिलाच धमकावले. माझा मुलगा सांगेल तसे कर असे म्हणत तिला गप्प बसण्यास सांगितले. त्याच रात्री तिच्या पतीने तिला बळजबरी विवस्त्र होण्यास भाग पाडले. तशाच अवस्थेत त्याने तिचे कॅमेऱ्याच्या मदतीने वेगवेगळ्या अँगलने फोटो काढले. एवढ्यावरच त्याचे समाधान झाले नाही. त्याने मोबाईल व टॅबमधे व्हिडीओ शुटींग देखील केली. सदर व्हिडीओ शुटींग आणि फोटो त्याने त्याच्या लॅपटॉप मधे स्टोअर करुन ठेवली.

या सर्व त्रासाला कामिनी वैतागली. काही दिवसांनी या फोटोसेशन आणि व्हिडीओ शुटींगच्या बळावर तो तिला त्रास देवू लागला. त्याने तिला म्हटले की तुझ्या आईवडीलांनी लग्नात कमी हुंडा दिला. आता तु तुझ्या आईवडीलांकडून पैसे घेवून ये. नाही तर मी तुझे नग्न फोटो आणि शुटींग व्हायरल करेन. कामिनीच्या पतीने तिच्या बॅंकेचा डाटा घेण्यासाठी तिला बळजबरी केली. तिचे बॅंक खाते त्यानेच हॅक केल्याची तिची खात्री झाली. तिच्या मोबाईल क्रमांकाला त्याने क्लोन केल्याचा देखील तिला संशय आला. तिच्या मोबाईल क्रमांकाचे इनकमींग व आऊटगोईंग कॉल त्याने हॅक केले असावे अशी तिला शंका येवू लागली.

तिच्या पतीने बळजबरी तिच्या सह्या कोऱ्या स्टॅंप पेपरवर घेतल्याचा तिने आरोप केला. पतीसह सासरच्या मंडळींवर विविध आरोपांची यादी घेवून तिने रामानंद नगर पोलिस स्टेशन गाठले. रामानंद नगर पोलिस स्टेशनला कामिनीने दिलेल्या फिर्यादीनुसार तिचा पती, सासरे, सासु, नणंद अशा चौघांविरुद्ध विविध आरोप केले. तिच्या फिर्यादीनुसार जळगाव येथील रामानंद नगर पोलिस स्टेशनला गु.र.न. ३३७/२० भा.द.वि. ४९८ अ, ३२३, ५०४, ५०६, ३४, ३७७, ४०६, माहीती तंत्रज्ञान कायदा २००८ चे कलम ६६(ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास रामानंद नगर पोलिस स्टेशनचे पो.नि. अनिल बडगुजर व त्यांचे सहकारी जितेंद्र तावडे करत आहेत. (या कथेतील पिडीतेचे कामिनी हे नाव काल्पनिक आहे.)

पान ८ वरून....

### माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या ...

श्रीमती इंदिराजींनी देशाची स्वतंत्रता, एकता, अखंडता, सार्वभौमता टिकवण्यासाठी जीवनभर कार्य केले. त्यासाठी प्राणांचे बलिदान दिले. त्यांच्या कार्याचे व बलिदानाचे स्मरण करत असतानाच आपापसातील वाद, मतभेद शांततेच्या मार्गाने मिटवण्याचा व संपूर्ण देश हिंसाचारमुक्त करण्यात आपलेही योगदान असले पाहिजे. इंदिरा गांधींनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात दिलेल्या योगदानाचे तसेच स्वातंत्र्योत्तर काळात पंतप्रधान म्हणून केलेल्या कार्याचेही त्यांनी स्मरण केले. बांगलादेशची निर्मिती, बॅंकाचे राष्ट्रीयकरण, अलिप्त राष्ट्र शिखर परिषदेचे नेतृत्व करताना इंदिराजींनी बजावलेल्या भूमिकेचे स्मरण करून उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

### भाजपा ओबीसी मोर्चाची ...

अध्यक्ष दिनेश पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले पालघर जिल्हा परिषद पक्षाच्या विकास विस्तारासाठी सदैव तत्पर राहील असे मान्यवरांना त्यांनी आश्वासन दिले ओबीसी समाजाला योग्य न्याय मिळावा अशी भावना त्यांनी व्यक्त केली कार्यक्रमासाठी उपस्थित राहून पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली सोहळ्यात खालील प्रमाणे वाटप करण्यात आले दिनेश पाटील अध्यक्ष, नंदन वर्तक सरचिटणीस, राजेश किनी सरचिटणीस, नितेश घरत कोषाध्यक्ष, हरिश्चंद्र पाटील उपाध्यक्ष, वैभव पडवळे उपाध्यक्ष, उमेश सपकाळे उपाध्यक्ष, चेतन म्हात्रे उपाध्यक्ष, वासुदेव पाटील उपाध्यक्ष, सचिन पुण्यार्थी सचिव, तुषार पाटील सचिव, किरण जाधव सचिव, दुर्वेश पाटील अध्यक्ष, धनेश खंडागळे सोशल मीडिया तर सर धनश्री चौधरी ओबीसी महिला मोर्चा पालघर जिल्हा अध्यक्ष.

पदनियुक्ती सोहळ्यासाठी योगेश टिळेकर भाजपा ओबीसी आघाडी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, बाबाजी काठोळे ज्येष्ठ नेते, नंदकुमार पाटील जिल्हाध्यक्ष, हरिचंद्र भोईर ओबीसी आघाडी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, वनिता लोंढे महिला आघाडी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, डॉक्टर श्रीमंत सहरा आदिवासी आघाडी सचिव, संतोष जनाठे संघटक संघटन,सरचिटणीस, सुरेश पाटील, सुजित पाटील, सुशील सरकर, संदीप पवार मंगेश पाटील, प्रशांत पाटील, मिलिंद ढोले, ज्योती भोये, राजू दळवी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश किणे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन धनश्री चौधरी यांनी केले

23 TO 29 NOV 2020 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 21/11/2020 8:01 PM Page 1



# राज्यात नव्या वर्षात भाजपाचे सरकार येणार -आ.रमेशअप्पा कराड

लातूर/प्रतिनिधी

राज्यातील आघाडी सरकार विरूध्द जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला असून या सरकारच्या कार्यकाळात या सरकारच्या कार्यकाळात कोणीही समाधानी नाही. सत्ताधार्यात कोणाचा कोणाला मेळ नाही यामुळे हे सरकार जास्त काळ टिकणारे नाही. नव्या वर्षात राज्यात भाजपाचे सरकार येणार हे सुर्यप्रकाशा इतके सत्य असल्याने शिरीष बोराळकर हे सत्ताधारी पक्षाचे आमदार असतील असे प्रतिपादन भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी केले. मराठवाडा पदवीधर मतदार संघातील भाजपा व मित्र पक्षाचे उमेदवार शिरीष बोराळकर यांच्या प्रचार नियोजनार्थ रेणापूर, औसा, निलंगा आणि मुरूड येथे गुरूवारी भाजपा पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधीची बैठक झाली.




या बैठकीत मार्गदर्शन करताना आ. कराड बोलत होते. यावेळी उमेदवार शिरीष बोराळकर, आ. अभिमन्यु पवार, पदवीधर निवडणूकीचे जिल्हा प्रमुख अरविंद पाटील निलंगेकर, प्रदेश भाजपाचे नागनाथ निडवदे, गणेशदादा हाके, जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, महिला आघाडीच्या प्रेरणा होनराव, स्वाती जाधव, ओबीसी सेलचे डॉ. बाबासाहेब घुले, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर चेवले, भागवत सोट, रमेश सोनवणे आदींची उपस्थिती होती. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांनी अनेक सामान्य कार्यकर्त्यांना नेते केले. रमेश आणि शिरीष आमदार व्हावेत ही त्यांची इच्छा होती. गेल्या निवडणूकीत शिरीष बोराळकर यांना मुंडे साहेबांनीच उमेदवारी दिली. मात्र त्यांचे अकाली निधन झाल्याने कोणीही निवडणूकीत प्रचार केला नाही. तरीही थोडया मतांनी त्यांचा पराभव झाला असे सांगून यावेळी बोलताना आ. कराड म्हणाले की, मी आमदार झालो शिरीष निवडणूक मैदानात आहेत. स्व. मुंडे साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पहिल्या पसंतीचे अधिकाधिक मते बोराळकर यांना मिळावेत यासाठी भाजपाच्या प्रत्येक लोकप्रितिनीधी आणि पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

पुढे बोलताना कराड म्हणाले की, जिल्हयाचे माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यांना पदवीधर मतदार संघातील निवडणूकीचे प्रमुख म्हणून पक्षाने जबाबदारी दिल्याने नेत्याची आणि पक्षाची मान उंचावण्यासाठी जिल्हयातून बोराळकरांना मताधिक्य मिळवून देणे गरजेचे आहे. पदवीधराचे पतिनिधीत्व करणार्या आमदार महाशयांनी १२ वर्षात काय काम केले असा प्रश्न उपस्थित करून ही आमदारकी त्यांना केवळ स्वताचे उद्योगधंदे संभाळण्यासाठी आणि नात्यागोत्याचे राजकारण करण्यासाठी हवी आहे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी गेल्या ६ वर्षात गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या कल्याणकारी अनेक योजना सुरू केल्या. मोठया प्रमाणात घरकूल योजना राबवीली. गेल्या ७ - ८ महिण्यापासून फुकट धान्य दिले. जिल्हयात हजारो कोटींची रस्त्याची कामे सुरू आहेत असे सांगून आ. कराड म्हणाले की, सत्तेच्या खूर्चीसाठी शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराला तिलांजली देणाऱ्या मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांना मातोश्री बाहेर महाराष्ट्र आहे हे कधी कळणार. कोरोना काळात जनता संकटात सापडली, अतिवृष्टीने शेतकरी उध्दवस्त झाला. या सरकारने काय मदत केली? मागील काळात कशा कशाची मदत मिळतेय हेच समजत नाही याची आठवणही त्यांनी करून दिली. पदवीधर हा विविध क्षेत्रात विखूरलेला आहे. त्यांचे अनेक प्रश्न आहेत या सर्व प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी सर्वसामान्याच्या हितासाठी शिरीष बोराळकर हेच विजयी होणे गरजेचे असल्याने सर्वांनी जिद्दीने, मेहनतीने काम करून पहिल्या पसंतीचे अधिकाधीक मतदान कशा पध्दतीने मिळेल यासाठी जाणीवपूर्वक परिश्रम पुर्वक प्रयत्न करावेत असेही आवाहन आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

चारही ठिकाणी झालेल्या बैठकीत भाजपाच्या पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधीचा मोठा प्रतिसाद मिळाला. प्रत्येक ठिकाणी उमेदवार शिरीष बोराळकर, जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड, आ. अभिमन्यु पवार, पदवीधर निवडणूकीचे जिल्हा प्रमुख अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह अनेक प्रमुखांनी केंद्र शासनाचे कार्य, राज्यशासनाची निष्क्रियता सांगून पदवीधर निवडणूकीत पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी करावयाची कामे, त्यांची जबाबदारी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करून अनेक सुचना केल्या. निलंगा येथील बैठकीस दगडू साळूंके, मिलींदअप्पा लातूरे, राधा बिराजदार, अंजली बोंडगे, अजित माने, शाहूराज थिटे, ज्ञानेश्वर बरमदे, तानाजी बिराजदार, विरभद्र स्वामी, संतोष वाघमारे, धोंडीराम बिराजदार, मनोज काळे, अरूण सोळंके. औसा येथे सुभाष जाधव, महेश पाटील, काकासाहेब मोरे, ज्ञानेश्वर वाकडे, लहू कांबळे, मुक्तेश्वर वागदरे, सुशिलदादा वाजपेयी, सुनिल उटगे, अरविंद कुलकर्णी, संतोषअप्पा मुक्ता, कल्पनाताई डांगे, जयश्री घोडके, विजयमाला रंदवे रेणापूर येथील बैठकीत दशरथ सरवदे, सुरेंद्र गोडभरले, अनिल भिसे, अनंत चव्हाण, वसंत करमुडे, आरती राठोड, अभिषेक आकनगिरे, विजय चव्हाण, कुलभूषण संपते, दत्ता सरवदे, ज्ञानोबा भिसे, श्रीकृष्ण पवार, ललिता कांबळे, अनुसया फड, महेश गाडे, श्रीकृष्ण मोटेगावकर, मुरूड येथे साहेबराव मुळे, बन्सी भिसे, विजय काळे, अनंत कणसे, हणमंत नागटिळक, चंद्रसेन लोंढे, भागवत सोट, वैभव सापसोड, विनायक मगर, लता भोसले, महेश कणसे, सुरज शिंदे, शाम वाघमारे, भैरवनाथ पिसाळ, विश्वास कावळे, काशीनाथ ढगे, सुधाकर गवळी, रशिद पठाण यांच्यासह त्या त्या तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्यासह अनेकजण मोठया संख्येन उपस्थित होते.

## कोरोनावर मात करण्यासाठी सर्व विभागाने अधिक सक्षमपणे काम करावे -जिल्हाधिकारी

लातूर : कोरोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही व ही लाट पहिल्या लाटेपेक्षा अधिक नुकसानकारक असु शकते तरि जिल्हयातील वैद्यकीय व प्रशासनातील सर्व विभागाने कोरोना संसर्गावर मात करण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक सक्षमपणे काम करावे असे आवाहन जिल्हाधिकारी जी.श्रीकांत यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित कोरोना आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, महानगर पालिका आयुक्त देवीदास टेकाळे, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे,जिल्हा आरोग्य अधिकारी गंगाधर परगे, डॉ.श्रीधर पाठक उपस्थित होते. जिल्हयात थंडीची दिवस आहेत. काही प्रमाणात कोवीड सेंटर बंद केलेले आहे. यापुढे जिल्हयात कोरोना संसर्गाची दुसरी लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोरोनाचा प्रादुर्भाव झालाच तर जिल्हयातील वैद्यकीय व प्रशासनातील सर्व विभागाने सक्षम पणाने त्याचा प्रतिकार करावा लागेल यासाठी सर्वांनी याची खबरदारी घेऊन दक्षता बाळगावी असे सूचित केले. जिल्हयात इयत्ता ९वी १० च्या शाळा व ११ वी १२ वी कनिष्ठ महाविद्यालय सुरु होत आहेत. जिल्हयात कोरोनाचा प्रार्दुभाव वाढू शकतो. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तयारी ठेवली पाहीजे. वैद्यकीय क्षेत्रात ज्या काही उनीवा, कमतरता आहेत त्या मजबुत करुन समन्वय ठेवणे नितांत गरजेचे आहे. कोरोना काळात नोडल अधिकारी यांनी चांगले काम केलेले आहेत. जिल्हयात औषधाचा मुबलक साठा असून व्हेंटीलेटरची कमतरता भासणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच काही विभागाचे प्रस्ताव प्रलंबित असतील तर त्यांनी ताबडतोब मंजूर करुन घ्यावेत असे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

## जंगलातील पक्षी वाचवण्यासाठी वनाधिकाऱ्याची गावोगावी जाऊन जनजागृती

भिवंडी/अभिजित हिरे

महाराष्ट्र शासनाने ५ नोव्हेंबर ते१२ नोव्हेंबर २०२० पक्षी सप्ताह जाहीर केल्याने भिवंडी तालुक्यातील तब्बल दोन हजार हेक्टर जंगलातील पक्षी वाचवण्यासाठी वनअधिकारी साहेबराव खरे हे दिवसरात्र मेहनत घेऊन प्रत्येक गावोगावी जाऊन नागरिकांना, मुलांना एकत्र करून जंगल आणि पक्षी वाचवण्याचे धडे देत आहे त्यामुळे नागरिकही चांगला प्रतिसाद देत असून पक्षी आणि जंगल वाचवण्यासाठी आता नागरिक सुद्धा पुढाकार घेताना पाहावयास मिळत आहे.

भिवंडी तालुक्यातील दाभाड, आदिवासी पाडा, पहारे, आवळे, विश्वगड, कुशिवली, गोंड पाडा, राऊत पाडा, खंबाला, जावईपाडा सह बहुसंख्य गाव आणि पाड्यात वनअधिकारी साहेबराव खरे हे जाऊन सकाळ, दुपार, संध्याकाळी सरपंच, सदस्य, पोलीस पाटील, समाजसेवक, महिला, मुले आणि नागरिकांना एकत्र घेऊन त्यांना जंगलाचे रक्षण कसे करायचे, वणवा कसा टाळायचा, पशु पक्षांचे रक्षण कसे करायचे याची सविस्तर माहिती देऊन त्याच प्रमाणे जंगलात नेवून वनअधिकारी साहेबराव



खरे हे झाडांची माहिती, पक्षांची घरटी, पक्षांची माहिती देऊन वन्यजीव कायदा आणि पक्षी संवर्धन या विषयी जनजागृती करीत आहे. यामध्ये नागरिकांचाही मोठा सहभाग घेत आहे.

महत्वाची बाब म्हणजे वनअधिकारी साहेबराव खरे यांनी आवळे, विश्वगड आणि पहारे परिसरातील ओसाड झालेले डोंगरावर अकरा हजार झाडें लावून आज हे डोंगर हिरवाईने नटले आहेत, वृक्ष प्रेमी आणि पर्यावरण प्रेमी दाभाड येथील अमोल भोईर यांनी वनविभागा कडे जखमी अवस्थेत सापडणाऱ्या पशु पक्षांच्या निवाऱ्यासाठी एक लोखंडी पिंजरा वनपाल किरवली यांचेकडे सुपूर्द केला. तर शांताराम पाटील, सरपंच अनंता पाटील, प्रमोद सुतार, दिपक भोईर, प्रल्हाद पाटील, अंकूश पाटील, प्रगतशील शेती पुरस्कार विजय पाटील, पोलीस पाटील गणेश पाटील, कुणाल पाटील यांनी विशेष सहकार्य करत आहे. तर वन परिक्षेत्र अधिकारी संजय धारावणे यांच्या मार्गदर्शनाखाली वनअधिकारी साहेबराव खरे यांच्यासह वनरक्षक प्रमोद सुतार, विष्णू आसवले हे विशेष परिश्रम घेत असून वाहनचालक विकास उमतोल यांचे ही सहकार्य लाभत आहे, वन विभागाच्या या प्रयत्नामुळे जंगल आणि पशु पक्षी वाचवण्यास नक्कीच यश मिळणार आहे.

## जनहितार्थसाठी कुशल नेतृत्व व आक्रमक आंदोलने हेच राष्ट्रवादीतील प्रविण पाटील यांच्यात कौशल्य!

भिवंडी/प्रतिनिधी



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सक्रिय असलेले कार्यध्यक्ष प्रविण पाटील यांच्यात असलेले कुशल नेतृत्व आणि आक्रमक आंदोलनाची धमक यामुळेच भिवंडी शहरातील नागरिकांच्या अनेक समस्यांना वाचा फोडण्यात यश आले असून न्याय मिळाला आहे कोणत्याही पदाची अपेक्षा न करता फक्त ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण ही भूमिका प्रविण पाटील बजावत आहे त्यामुळे आज राष्ट्रवादी काँग्रेसला मोठं बळ मिळत असल्याचे पाहावयास मिळत आहे.

प्रविण पाटील यांचे वडील पोलीस खात्यात असल्यामुळे कायद्याची माहिती आणि पोलिसांशी असलेले घनिष्ट संबंध त्यामुळे कोणत्याही गरीब, पीडित नागरिकांसाठी पुढाकार घेऊन त्यांना न्याय देण्यासाठी अहोरात्र धावपळ करून न्याय मिळवून देणे त्याच प्रमाणे यंत्रमाग शहरात असलेल्या लाखो यंत्रमाग कामगारांच्या समस्या साठी धाव घेऊन त्यांना सहकार्य करणे, त्यामुळे मोठा कामगारवर्ग त्यांच्या पाठीशी आजही उभा आहे. भिवंडी शहरात कचऱ्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्या असताना १५ दिवस कचऱ्याचे ढिग शहरात साचले होते. त्यावेळी एकही राजकीय नेता, लोकप्रतिनिधी पुढे आला नाही. त्यावेळी फक्त प्रविण पाटील यांनी आक्रमक आंदोलन करून कचऱ्याने भरलेला डम्पर थेट महापालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या आवरात नेवून कचरा टाकला. त्यामुळे एकच प्रशासनाची धावपळ झाली होती आणि या आंदोलनाची दखल घेऊन दुसऱ्या दिवसापासून शहरात स्वछता राबवण्यात आली होती. तसेच चित्र आजही पाहवयास मिळत आहे. महत्वाची बाब म्हणजे टोरंट पावर या वीज कंपनीने वीजबिल वसुली आणि वीज वितरणाचे काम हाती घेतले असताना सर्वात प्रथम आंदोलन करून तब्बल तीन दिवस काम बंद पाडण्यात यश मिळवले होते. त्यानंतर कंपनीलाही दखल घ्यावी लागली होती. महत्वाची बाब म्हणजे भिवंडी महापालिकेला टोरंट पावर वीज कंपनीकडून २८५ करोड घेणे असताना बॅनर बाजी आंदोलन करून सरकारला याची दखल घेऊन सर्व पैसे कंपनीला सरकारने माफ केले आहे. त्याच प्रमाणे ड्रेनेज लाईनचे निकृष्ट दर्जाचे काम, रोड खोदून ठेवल्याने नागरिकांची होणारी परवड पाहून मोठं आंदोलन केल्याने तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दखल घेऊन त्या ठेकेदाराचा ठेकाच रद्द करण्यात आला होता. रोडवरील खड्ड्यामुळे अपघाताच्या घटनात वाढ होत असल्याने चक्क खड्ड्यात बसून आंदोलन केले होते. त्यामुळे महापालिकेने खड्डे बुजवून नागरिकांना दिलासा मिळाला होता. भिवंडी शहरात असलेल्या डाईंग, सायजिंग कंपन्यात चिंध्या आणि लाकूड जाळून प्रदुषणात वाढ होत असल्याने थेट कंपन्यात जाऊन आंदोलन करून कंपन्या बंद पडल्याने प्रदुषण विभागाला जाग करीत कारवाया करायला लावल्या आहे. त्यामुळे चिंध्या जाळणे बंद करण्यात आले आहे. अशा प्रकारे जनहितार्थ आंदोलने करून नागरिकांना न्याय देण्याचे काम प्रविण पाटील करताना पाहवयास मिळत आहे. त्यांच्याकडे कुशल नेतृत्व आणि आक्रमक आंदोलने हिच त्यांची खासियत असून ते कोणत्याच पदाची अपेक्षा करीत नसल्याने त्यांचा वेगळेपणा पाहावयास मिळत आहे.

## भिवंडीत पुन्हा यंत्रमाग कारखान्याला भिषण आग

भिवंडी/प्रतिनिधी

आगीचे सत्र सुरूच असून सकळाच्या सुमारास शहरातील खोका कंपाऊंड परिसरामध्ये असलेल्या एका यंत्रमाग कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. भिवंडीतील मनसुख जाखरिया यांच्या मालकीचा कल्याण नाका परिसरातील खोका कंपाऊंडमध्ये यंत्रमाग कारखाना आहे. या कारखान्यात कपड्यांचा मोठ्या प्रमाणात साठा साठवून ठेवण्यात आला आहे. तर कारखान्याच्या आजूबाजूला सुमारे ४० ते ५० रहिवाशी घरे आहेत. आग लागतच रहिवासी परिसरात एकच खळबळ उडाली होती. हि आग एवढी भीषण आहे कि कारखानाच्या छताचे पत्रे तुटून हवेत उडत होते. त्यामुळे आजूबाजू राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. खबद्रारीचा उपाय म्हणून अग्निमशन दलाच्या जवानांनी पोलिसांच्या व स्थानिकांच्या मदतीने



रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हवलुन त्यांच्या घरातील गॅस सिलेंडरही काढण्यात आले. दरम्यान, या भीषण आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी आणखी २ तास लागणार असल्याची माहिती अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्याने दिली असून मात्र आगीचे कारण अष्पष्ट अद्यापही असून आतापर्यत कुठलीही जीवितहानी झाली नसल्याचे वृत्त आहे. सध्या घटनास्थळी अग्निशमन दलाच्या दोन गाड्या दाखल असून आगीवर दोन तासांनी नियंत्रण मिळवले आहे.

## थोडक्यात वृत्तांत

### ३०३१ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा

भिवंडी : परतीच्या पावसाने शेतीचे अतोनात नुकसान झाल्याने बळीराजा हवालदिल झाला असताना शासनाने ठाणे जिल्ह्यातील अवकाळी व परतीच्या पावसाने नुकसान झालेल्या शेतीच्या नुकसानीचे पैसे देण्यास सुरुवात केली असून नुकताच एन दिवाळीच्या धनत्रयोदशीच्या दिवशी भिवंडी तहसीलदार अधिक पाटील यांनी तब्बल ३ हजार ३१ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात दीड कोटी रुपयांची रक्कम जमा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न केला आहे. भिवंडी तालुक्यात सन २०१९ व २०२० मध्ये अवकाळी पाऊस व परतीच्या पावसाने भात शेतीचे अतोनात नुकसान झाले असताना शासना कडून तहसीलदार कार्यालयात २०१९ चे १ कोटी ५० लाख व २०२० चे १ कोटी ९५ लाख रुपये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून देण्यासाठी जमा झाले असता धनत्रयोदशी निमित्त शासकीय कार्यालयांना सुट्टी असतानाही तहसीलदार अधिक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गटविकास अधिकारी डॉ.प्रदीप घोरपडे, निवासी नायब तहसीलदार गोरख फडतरे, कृषी सहाय्यक गोपाळ बांबळे, नायब तहसीलदार महेश चौधरी, मंडळ अधिकारी, तलाठी यांनी कार्यालयात उपस्थित राहत या बाबतची संपूर्ण पूर्तता करून सर्व रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केले आहेत.

### जुळ्या नातीच्या जन्माचे जंगी स्वागत

लातूर : समाजात एकीकडे पूरूषप्रधान संस्कृतीमध्ये जीवन जगत असताना जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून वैचारीक चळवळीमध्ये वनीताताईंनी प्रवेश केला. स्थानिक पातळीपासून ते विभागीय स्थरापर्यंत वाटचाल केल्यामुळे कौटुंबिक वाटचालीतही बदल झाला अन् जीजाऊ ब्रिगेडच्या विभागीय अध्यक्षा वनिताताई काळे यांनी आपल्या जुळ्या आरोही आणि आरूषी नातीच्या जन्माचे जंगी स्वागत करून समाजासमोर एक आगळा-वेगळा आदर्श निर्माण करण्याचे काम केले आहे. त्यांनी निर्माण केलेला हा आदर्श समाजातील इतर कुटुंबासाठीही प्रेरणादायी ठरणारा आहे. समाजामध्ये जीवन जगत असताना प्रत्येक कुटुंबप्रमुखाची संसारीक जीवनामध्ये पहिल्यांदा मुलगाचा व्हावा, अशी अपेक्षा असते. आणि अपेक्षा असूनही मुलगी झाली तर त्या मुलीकडे पाहण्यचा दृष्टिकोण वेगळाच राहतो. परंतु जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय अध्यक्षा वनीताताई काळे यांची वाटचाल वैचारीक चळवळीत झाली असल्यामुळे त्यांनी आपल्या मुलांचेही लग्न हुंडा न घेता शिवधर्म पध्दतीने केले. तसेच मुलगा पविण माने आणि सुन मनिषा माने यांच्या पोटी झालेल्या जुळ्या आरोही आणि आरोषी या मुलींच्या जन्माचे शहरातील सोलंकर नगर भागात जंगी स्वागत केले. त्या भागातील विठ्ठल रूक्मिनी मंदिर परीसरातून ढोल ताशाच्या गजरात चिमुलकल्या मुलींची घरापर्यंत मिरवणूक काढत त्यांच्या स्वागताचा जंगी समारंभ कोरोनाच्या पार्श्वभूमिवर सोशल डिस्टसिंगचे पालन करून करण्यात आला. याच कार्यक्रमात सामाजिक ध्येयाने प्रेरीत झालेल्या मान्यवरांचाही यशोचित सन्मान करण्यात आला. वनीताताई काळे यांनी सामाजिक बांधीलकीतून ऐन दीवाळीत राबविलेल्या या विधायक कृतीचे समाजमनातून स्वागत होत आहे. या त्यांच्या सामाजिक आदर्शातून राबविण्यात आलेल्या उपक्रमाला सुदर्शन शिक्षक संस्थेचे अध्यक्ष संदिपान माने यांचीही मोलाची साथ मिळाली. स्पर्धेच्या युगातही जुळ्या मुलीच्या स्वागताचा उपक्रम त्यांनी राबविल्यामुळे समाजामध्ये मुलीच्या आगमनाची विधायक चर्चा सुरू झाली आहे. त्यांनी सामाजिक दृष्टिकोणातून राबविलेला हा उपक्रम समाजातील प्रत्येक घटकासाठी दिशा देणारा ठरला आहे.

### नगर पंचायत प्रभाग रचनेच्या कार्यक्रमात बदल

लातूर : राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १२ ऑक्टोबर २०२० च्या पत्रान्वये लातूर जिल्हयातील चाकूर,जळकोट,देवणी, शिरुर अनंतपाळ या चार नगर पंचायतीचा प्रारुप प्रभाग रचना तयार करणे ते अंतीम प्रभाग रचना तयार करणेचा कार्यक्रम जाहीर केला आहे. तथापी सध्या राज्यात पदवीधर मतदार संघ व शिक्षक मतदार संघाची निवडणूक प्रक्रिया चालू असल्याने व मतदान दिनांक १ डिसेंबर २०२० रोजी व मतमोजणी दिनांक ३ डिसेंबर २०२० रोजी असल्याने राज्य निवडणूक आयोगाने नगर पंचायत प्रभाग रचना कार्यक्रमात दिनांक १३ नोव्हेंबर २०२० च्या पत्रान्वये बदल केला आहे. यामध्ये प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्दीची तारीख दिनांक १८ नोव्हेंबर २०२० व त्यावर आक्षेप व हरकती दाखल करणे दिनांक १८ नोव्हेंबर २०२० ते दिनांक २६ नोव्हेंबर २०२० यामध्ये कोणताही बदल झालेला नाही. मात्र प्राप्त हरकती व सुचनावर सुनावणी घेण्याची मुदत दिनांक ४ डिसेंबर २०२० रोजी पर्यंत होती ती दिनांक १० डिसेंबर २०२० (गुरुवार) पर्यंत करण्यात आली आहे. हरकती व सुचनावर अभिप्राय देऊन अंतीम प्रभाग रचना प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना सादर करण्याची मुदत दिनांक १० डिसेंबर २०२० ऐवजी दिनांक १५ डिसेंबर २०२० (मंगळवार) ही निश्र्चित केली असून विभागीय आयुक्त यांनी अंतीम प्रभाग रचनेस मान्यता देणेचा दिनांक १७ डिसेंबर २०२० ऐवजी दिनांक २४ डिसेंबर २०२० (गुरुवार) करण्यात आली आहे व अंतीम प्रभाग रचना अधिसुचना जिल्हाधिकारी यांनी प्रसिध्द करण्याची तारीख दिनांक २४ डिसेंबर २०२० ऐवजी दिनांक ३० डिसेंबर २०२० (बुधवार) निश्र्चित केली आहे. या चारही नगर पंचायत क्षेत्रातील नागरिकांनी बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी केले आहे.

## आगीत भाताचे भारे जळून खाक; दोन दिवसातील दुसरी घटना

वाडा/प्रतिनिधी

वाडा तालुक्यातील तीळगाव येथील शेतकरी अविनाश पांडुरंग पाटील यांच्या शेतातील भात कापून खळ्यावर ठेवला होता त्याला गुरुवारी आग लागल्याने सर्व भात जळून खाक झाला आहे. या वर्षीच्या अतिवृत्तीमुळे भात पिकाचे भरमसाठ नुकसान झाले आहे त्यातून जेमतेम कसे तरी वाचलेले धान्य आगीच्या भक्षस्थानी गेल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. बुधवारी (दि.१९) सकाळी पाटील यांना फोन द्वारे माहिती मिळाली की त्यांच्या खळ्यावरील भाताला आग



लागली आहे. ही माहिती मिळताच पाटील खळ्यावर गेले असता खळ्यावरील दोन्ही वुडव्यास आग लागुन त्यामधुन धुर निघत होता. पाटील यांनी गावातील लोकांची मदत घेऊन पाण्याने वुडव्यास लागलेली आग विझवण्याचा प्रयत्न केला परंतु आगीचा जोर जास्त असल्याने ती अटोक्यात आली नाही. सदर आगीमध्ये साडे तिन लाख रुपयाचे दोन हजार भाताचे भारे (धान्यासह ) जळून खाक झाले असल्याची माहिती अविनाश पाटील यांनी दिली. सदरच्या आगीचे कारण समजू शकले नाही.अशाच प्रकारची आग दोन दिवसांपूर्वी (वंगणपाडा) मांगरूळ येथील शेतकऱ्याच्या भाताच्या भाऱ्यांना आग लागून हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.

23 TO 29 NOV 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 21/11/2020 8:02 PM Page 1



# भिवंडीतील काटई ग्रामस्थांना करावी लागते पाण्यासाठी वणवण!

भिवंडी/अभिजित हिरे

भिवंडी शहराच्या अगदी जवळ हाकेच्या अंतरावर असणाऱ्या काटई ग्रामपंचायत हद्दीत मागील कित्येक वर्षापासून पाणी टंचाई ची समस्या उद्भवली असून, नागरिकांना गेल्या अनेक महिन्यापासून पाण्या साठी वणवण करावी लागत आहे. ग्रामपंचायत हद्दीतील लोकसंख्या जवळपास २० हजारच्या आसपास असलेल्या या गावात नळ आहेत पण नळाला पाणी नाही असे चित्र सर्वत्र दिसत आहे. गेल्या अनेक महिन्या पासून गावातील नळाला पाणी नाही त्यामुळे येथील कुटुंबियांना पिण्याचे पाणी फिल्टर प्लांट वाल्यां कडून विकत घ्यावे लागत आहे. तर घरातील सर्व कामे सोडुन महिला व पुरुषांना पाण्यासाठी भटकत रहावे लागत आहे. काटई ग्रामपंचायत हद्दीतील गृहिणींना सुद्धा आपल्या घरातील इतर कामे सोडून बोरवेलच्या पाण्यासाठी रांगेत उभे रहावे लागत आहे. तर अनेक जण पाण्याच्या छोट्या टँकर ने पाण्याची सोय करीत आहे.



गावात बोरवेल पैकी काही बंद आहेत तर ज्या चालू आहेत त्यांना खारट पाणी येत असल्याने ते खारट पाणी रोजच्या इतर दैनंदिन कामा साठी वापरावे लागते. गावातील पुरुष मंडळी आपल्या दुचाकींचा उपयोग पाणी वाहतूक करण्यासाठी करीत आहेत. पाणी वितरण करणाऱ्या स्टेम वॉटर कंपनी कडून ग्रामीण भागातील काही ग्रामपंचायतींना सुद्धा पाणी पुरवठा केला जातो त्यानुसार या ग्रामपंचायतीस स्टेम कडून १ एमएलडी पाणी मंजूर असून ते भिवंडी शहरातील ज्या भागातून पाईप लाईनद्वारे वितरण केले जाते त्या भिवंडी शहरातील मिल्लत नगर, संगमपाडा या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत नळ जोडण्या केल्या गेल्याने हे १ एम एल डी पाणी गावातील टाकी पर्यत पोहचत नसल्याने संपूर्ण गावाला पाण्यासाठी वणवण करून भटकावे लागत आहे. या बाबत स्टेम प्रशासनासह भिवंडी महानगरपालिका प्रशासनास कारवाई करण्यासाठी अनेक विनंती पत्र देऊन ही कार्यवाही होत नसल्याने सरपंच मीना जाधव यांनी संताप व्यक्त केला आहे. गावात पाणी येत नसल्याने येथे राहणाऱ्या कामगार वर्गाचेही मोठे हाल होत आहेत पिण्यासाठी पाणी विकत आणण्यासाठी पैसे खर्च करावे लागत असल्याने ऐन दिवाळीच्या तोंडावर ही पाणी टंचाई ने नागरिकांचे हाल सोसावे लागत आहेत. या परिस्थितीत येत्या आठ दिवसात सुधारणा न केल्यास या विरोधात सर्व ग्रामस्थ उग्र आंदोलन करून जाब विचारतील असा इशारा ग्राम पंचायत सदस्य गणेश पाटील यांनी दिला आहे.

# विविध मागण्यांसाठी भाजपाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## पालघर जिल्हाधिकारी डॉ. गुरसळ यांना निवेदन सादर




वाडा/प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी पालघर जिल्ह्यातर्फे जनतेच्या विविध मागण्यांसाठी शुक्रवारी (दि.२०) जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते परंतु भाजपच्या कार्यकर्त्यांना विविध ठिकाणी पोलिसांच्या माध्यमातून अडविण्यात आले व दडपशाही मार्गाने मोर्चा दडपण्याची कारवाई करण्याचे काम आघाडी शासनाने केले आहे असे मत जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील यांनी व्यक्त केले आहे.

तरीही काही कार्यकर्ते छुप्या मार्गाने येऊन त्यांनी आपला निषेध नोंदविला तसेच भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते कोकण विभागाचे प्रभारी व माजी मंत्री आमदार रवींद्र चव्हाण, पालघर जिल्ह्याचे प्रभारी आमदार संजय केळकर तसेच पदवीधर मतदार संघाचे आमदार ठाणे शहराचे अध्यक्ष निरंजन डावखरे, भाजपा पालघर जिल्हा अध्यक्ष नंदकुमार पाटील, जेष्ठ नेते बाबाजी काठोळे यांच्या शिष्टमंडळाने जाऊन जिल्हाधिकारी यांना आपले निवेदन सादर केले व जनतेचा आक्रोश व्यक्त केला यानंतर या तिन्ही नेत्यांनी हॉटेल ताशी माहीम रोड पालघर येथे पत्रकार परिषद घेऊन आपल्या जनते बाबतच्या भावना व्यक्त केल्या तसेच पत्रकारांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली या पत्रकार परिषदेला वरील तीनही नेते पालघर जिल्ह्याचे अध्यक्ष नंदकुमार पाटील, वरिष्ठ नेते बाबाजी काठोळे, डहाणू नगराध्यक्ष भरत राजपूत, माजी आमदार पासकल धणारे, माजी जि.प अध्यक्ष सुरेखा थेतले, सरचिटणीस संतोष जनाठे, सुशील औसरकर, सुजित पाटील, हरिचंद्र भोये, युवा मोर्चाचे सुजित पाटील प्रशांत पाटील महिला मोर्चा ज्योती भोये व अर्चना पाटील, अशोक वडे, संतोष भोई, जयप्रकाश आळशी, इत्यादी प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद झाली अशी माहिती पालघर जिल्ह्याचे प्रसिद्धीप्रमुख पुंडलिक भानुशाली यांनी दिली आहे.

## मंत्रालयातील कार्यक्रमात घेतली राष्ट्रीय एकात्मतेची शपथ

# माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिवादन!



मुंबई/प्रतिनिधी

देशाच्या माजी प्रधानमंत्री, भारतरत्न दिवंगत इंदिरा गांधींनी सर्व जाती, धर्म, पंथ, प्रांतांच्या एकजुटीतून एक मजबूत, हिंसाचारमुक्त भारत घडविण्याचे स्वप्न बघितले होते. इंदिराजींचे ते स्वप्न पूर्ण करण्याचा आपण निर्धार करुया, असे आवाहन करीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिवंगत इंदिराजींच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन केले. दिवंगत इंदिराजींच्या जयंतीदिनी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त देशाचे स्वातंत्र्य, राष्ट्रीय एकात्मता अबाधित ठेवण्यासाठी निष्ठापूर्वक काम करण्याची शपथ घेत त्यांनी राज्यातील जनतेला राष्ट्रीय एकात्मता दिनाच्या शुभेच्छाही दिल्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात आयोजित विशेष कार्यक्रमात दिवंगत इंदिराजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव संजय कुमार, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव श्रीकांत देशपांडे, उपसचिव ज.जी. वळवी आदी मान्यवरांसह शासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्र्यांसह सर्व उपस्थितांनी यावेळी राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त देशाचे स्वातंत्र्य व राष्ट्रीय एकात्मता अबाधित ठेवण्यासाठी तसेच ती अधिक दृढ करण्यासाठी निष्ठापूर्वक कार्य करण्याची शपथ घेतली. आपापसातील सर्व धार्मिक, भाषिक किंवा प्रादेशिक मतभेद व तंटे किंवा इतर राजकीय वा आर्थिक गाऱ्हाणी शांततामय व संवैधानिक मार्गाने सोडवण्याचे प्रयत्न करण्याची शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी म्हणाले की, ...पान ६ वर

# भाजपा ओबीसी मोर्चाची कार्यकारीणी जाहिर




वाडा/प्रतिनिधी

वरिष्ठांच्या सूचनेनुसार बुधवार दि.१८ नोव्हेंबर रोजी वाडा तालुक्यातील खुपरी येथील मुरली मनोहर हॉटेल येथे भाजपा एक भव्य समारंभात ओबीसी मोर्चाच्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. या समारंभास विशेष उपस्थिती म्हणून भाजपा ओबसचे प्रदेश अध्यक्ष योगेश (अण्णा) टिळेकर हे उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी जिल्ह्यामध्ये ओबीसी बांधवांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू असे आश्वासन त्यांनी दिले पक्षाच्या विकासासाठी व विस्तारासाठी ओबीसी आघाडी महत्त्वाची भूमिका बजावेल असेही त्यांनी आपले मत व्यक्त केले.

तर नव नियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेछा देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अभिप्रेत असलेले संघटन बनविण्यासाठी जिल्हातील सर्वांना एकत्र करून पक्षाची ध्येय धोरणे व कार्यक्रम राबविताना सर्व पदाधिकारी व कार्यकत्यांना सोबत घेऊन पक्ष मजबुतीसाठी आपण प्रामाणिकपणे प्रयत्न कराल असा विश्वास व्यक्त करून तुम्हाला तुम्हाला दिलेलं हे पद नसून जबाबदारी आहे ती काटेकोरपणे व प्रामाणिक पणे पार पाडावी असेही सुचवले. ओबीसी मोर्चाचे पालघर जिल्हा नवनियुक्त ...पान ६ वर

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ)च्या जनसंपर्क कार्यालयाचे शानदार उद्घाटन




देवणी/प्रतिनिधी

देवणी येथे रापाई (आ) देवणीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रिपाइं (आ) राज्य सचिव मा.चंद्रकांत दादा चिकटे, रिपाइं (आ) लातूर जिल्हा अध्यक्ष मा.देवीदासजी कांबळे साहेब, रिपाइं (आ) लातूर जिल्हा उपाध्यक्ष मा.अंकुश भाऊ ढेरे, तसेच लातूर जिल्ह्यातील रिपाइं (आ)चे निलंगा तालुका अध्यक्ष, मा.संदीप कांबळे, जळकोट तालुका अध्यक्ष मा.विनोद कांबळे, शिऊर अनंतपाळ तालुका अध्यक्ष मा.मधुकर कांबळे, रेणापूर तालुका अध्यक्ष मा.धम्मानंद घोडके आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विक्रम गायकवाड यांची देवणी शहराध्यक्ष पदी व हरिबा गायकवाड यांची देवणी तालुका संघटक पदी निवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवणी तालुका अध्यक्ष मा.विलासजी वाघमारे व प्रस्ताविक केले. रिपाइं (आ) सोशल मिडिया आय.टी.सेल जिल्हा उपाध्यक्ष मा.गणेशभाऊ कांबळे दवणहिप्परगेकर यांनी आभार मानले. देवणी तालुका उपाध्यक्ष धनराज गायकवाड हे उपस्थित होते.





















CMYK